बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०

साप्ताहिक http://berartimes.com
# बेरार टाईम्स
मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे



गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध

आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१२ गोंदिया | अंक २७ | बुधवार,दि. १४ जून २०२३ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024

## मुख्यमंत्रीपदासाठी फडणवीसांपेक्षा एकनाथ शिंदेंना जास्त पसंती

**मुंबई**–राज्यातील सर्व प्रमुख वृत्तपत्रांत मराष्ट्रामध्ये मोदी, महाराष्ट्रात शिंदेफ अशी जाहीरात देत शिंदेसेनेने आज चांगलीच खळबळ उडवून दिली. झी टीव्ही व मॅटराईझ या संस्थेने केलेल्या सर्व्हेवर ही जाहीरात देण्यात आली आहे. त्यात महाराष्ट्रातील ४६.४ टक्के जनता भाजप आणि शिंदेंच्या शिवसेनेला पुन्हा सत्तेवर आणण्यासाठी इच्छुक आहे, असा दावा करण्यात आला आहे.

**फडणवीसांना शिंदेंचे आव्हान**

मात्र, या सर्व्हेक्षणातील सर्वात ठळक बाब म्हणजे महाराष्ट्रातील मुख्यमंत्रीपदाचे सर्वेक्षण. त्यानुसार एकनाथ शिंदे यांना महाराष्ट्रातील २६.१ टक्के जनतेला पुन्हा मुख्यमंत्रीपदी आणि देवेंद्र फडणवीस यांना २३.२ टक्के जनतेला मुख्यमंत्रीपदावर पाहायचे आहे. यासंदर्भात शिंदेसेनेने दिलेल्या जाहीरात केवळ शिंदे व मोदी यांचाच फोटो आहे. वर मराष्ट्रात मोदी, महाराष्ट्रात शिंदेफ असा दावाही केला आहे. जाहीरातीत म्हटले आहे की, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या जोडीने महाराष्ट्रात केलेल्या लोककल्याणकारी प्रकल्पांमुळे नुकत्याच झालेल्या एका सर्वेक्षणात त्यांना अव्वल स्थान मिळाले आहे.

**शिंदेंची मोठी झेप**

जाहीरातीतून देवेंद्र फडणवीसांना वगळणे, ही एकनाथ शिंदे यांची मोठी झेप आहे, असा टोला यावर राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळ यांनी लगावला आहे. या सर्व्हे व जाहीरातीमधून एकनाथ शिंदे यांनी देवेंद्र फडणवीसांनाच आव्हान दिल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. यावरून विरोधकही भाजप व देवेंद्र फडणवीसांना टोला लगावत आहे. पाहुयात या सर्व्हेत आणखी काय म्हटले आहे.

**कौल शिंदे–फडणवीसांकडे**

गेल्या काही काळामध्ये आलेल्या सर्व्हेमध्ये महाविकास आघाडी एकत्र लढल्यास त्याचा फायदा होऊ शकतो, असे समोर आले होते. परंतु झी न्यूजफने केलेल्या सर्वेक्षणामध्ये मतदारांचा कौल शिंदे फडणवीस सरकारच्या दिशेने दिसत आहे. या सर्वेनुसार जर आज निवडणुका झाल्या, तर युतीला ४६ टक्के मते मिळू शकतील. महाविकास आघाडीला ३५ टक्के मतदान होऊ शकते. मनसेला ३ टक्के मते मिळू शकतात. त्याचबरोबर २०१९ मध्ये काँग्रेससोबत जाण्याचा उद्धव ठाकरे यांचा निर्णय योग्य होता की, अयोग्य? या प्रश्नावर ५७ टक्के मतदारांनी हा निर्णय अयोग्य असल्याचे म्हटले आहे.

## पांगोलीच्या खोलीकरणाचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे



**गोंदिया, –**गोरेगाव, गोंदिया आणि आमगाव तालुक्यातील १०० पेक्षा अधिक गावांसाठी पांगोली नदी जीवनदायीनी आहे. मात्र गेल्या काही वर्षांपासून नदीचे पात्र अरुंद झाले आहेत. ठिकठिकाणी झुडपे वाढली. अनेक ठिकाणी नदीच्या पात्रांत अतीक्रमण झाले. त्यामुळे नदीचे अस्तित्व धोक्यात आले. वर्षातून केवळ तीन महिनेच नदीत पाणी असते. नदीला पुनर्जिवीत करण्याची मागणी होत आहे. जिल्हा प्रशासनाने देखील खोलीकरणाचा प्रस्ताव तयार केला. तो प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविण्यात आला आहे. मात्र अद्यापही खोलीकरणाला मंजुरी मिळाली नसल्याने नदीला गतवैभवासाठी पुन्हा किती वाट बघावी लागणार, असा सवाल उपस्थित होत आहे.

पांगोली नदीचा उगम गोरेगाव तालुक्यातील तेढा या गावातून झाला. या नदीत पूर्वी बाराही महिने पाणी राहत होते. गोरेगाव, गोंदिया आणि आमगाव तालुक्यातील शंभरावर गावे या नदीच्या पाण्यामुळे समृद्ध झाली होती. ही नदी मध्यप्रदेशाच्या सिमेवर असलेल्या वाघ नदीला जावून मिळते. पांगोली नदीला गोंदिया जिल्ह्यातील जीवनदायीनी म्हणून देखील संबोधण्यात येते. मात्र गेल्या काही वर्षांपासून नदीच्या पात्रांचे खोलीकरण करण्यात आले नाही. ठिकठिकाणी झालेले अतीक्रमण, जलपणी वनस्पतीचे वाढलेले प्रस्थ आणि वाढलेली झुडपे तसेच उथळ झालेले पात्र यामुळे नदीत पाणी राहत नाही. केवळ पावसाळ्यातील तीन महिनेच या नदीच्या पात्रांत पाणी राहते. त्यानंतर नदी कोरडी पडते. परिणामी नदीचे अस्तित्वच आता धोक्यात आले आहे. गेल्या काही वर्षांपासून पांगोली नदीच्या संवर्धानाच्या मागणीसाठी काही संस्था झटत आहेत.

वारंवार शासन आणि प्रशासनाकडे पाठपुरावा करत आहेत. उथळ झालेल्या नदी पात्रांचे खोलीकरण करून जागोजागी बंधारे बांधल्यास नदीत बाराही महिने पाणी उपलब्ध राहू शकते. त्याचा लाभ पिण्याकरिता आणि शेतीला देखील होवू शकते. संस्थांच्या वारंवारच्या पाठपुराव्यामुळे जिल्हा प्रशासनाच्या निर्देशावरून जल संधारण विभागाने नदी खोलीकरणाचा प्रस्ताव तयार केला. तो केंद्र शासनाकडे पाठविण्यात आला आहे.

मात्र अद्यापही त्या प्रस्तावाला केंद्र शासनाची मंजुरी मिळाली नाही. परिणामी पांगोलीचे गतवैभव परत आणण्यासाठी पुन्हा किती काळ प्रतीक्षा करावी लागते, हे काळच ठरवणार आहे.

**ठिकठिकाणी तस्करांनी पोखरले**

पांगोली नदी ज्याप्रमाणे नागरिक, जनावरांची तहाण भागविते. त्याचबरोबर शेतीला सिंचनाकरिता या नदीची मोठी मदत होत होती. परंतु, गेल्या काही वर्षांपासून नदीकाठावर अतिक्रमण झाले. गाळ मोठ्या प्रमाणात साचला आहे. तर अनेक ठिकाणी झुडपे वाढल्यामुळे पाण्याच्या प्रवाहावर त्याचा परिणाम होते. तर वाळू तस्करांनी देखील अनेक ठिकाणी नदीचे पात्र पोखरले आहेत. रात्रंदिवस रेती चोरीमुळे देखील नदीचे सौंदर्य खराब झाले आहे.

पांगोली नदीचे सर्वेक्षण करून खोलीकरणाचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. मंजुरीकरिता केंद्र शासनाकडे पाठविण्यात आला आहे. मंजुरी मिळाल्यानंतर खोलीकरणाच्या कामाला सुरूवात करण्यात येईल.

**अनंत जगताप, कार्यकारी अभियंता, गोंदिया.**

गोंदिया जिल्ह्याची जीवनदायिनी म्हणून ओळखण्यात येणा?या पांगोली नदीचे अस्तित्व धोक्यात आले आहे. नदीची अवस्था खूप वाईट आहे. नदीला पुनर्जिवीत करण्याकरिता खोलीकरण आणि अतिक्रमण करणे गरजेचे आहे. त्याकरिता गेल्या १० वर्षांपासून पाठपुरावा सुरू आहे. शासन, प्रशासनाकडे अनेकदा पत्रव्यवहार करण्यात आला. प्रक्रिया सुरू असल्याचे प्रशासनाकडून कळविण्यात आले आहे. सर्व समाजघटकांनी पांगोली नदी वाचविण्यासाठी एकत्र येणे गरजेचे आहे.

**तीर्थराज उके, समाजोन्नती बहु. संस्था**

## 'या' जिल्हा परिषद शाळेत प्रवेशासाठी ५०० विद्यार्थी प्रतीक्षेत




**वाशीम** : एकीकडे जिल्हा परिषद शाळेत दर्जेदार शिक्षण मिळत नसल्याची ओरड होत आहे. कमी पट संख्येच्या शाळा बंद होण्याच्या वाटेवर आहे. परंतु शिक्षकाची मेहनत आणि ग्रामस्थांच्या सहकार्यातून स्व. अटल बिहारी वाजपेयी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा दर्जेदार झाली. येथे ८५० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला असून, जवळपास ५०० विद्यार्थी प्रतीक्षेत आहेत. ही नक्कीच प्रेरणादायी बाब आहे.

तालुक्यातील साखरा येथील जिल्हा परिषद शाळा जवळपास ३५ एकरावर विस्तारीत असून गावाची लोकसंख्या एक हजार आहे. येथे दर्जेदार व सुसज्ज इमारत आहे. येथे शिक्षकांची संख्या १८ आहे. एकीकडे जिल्हा परिषद शाळा अखेरच्या घटका मोजत असताना ही शाळा मात्र आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचली आहे. येथील शिक्षक जीवापाड मेहनत घेतात. त्यांना ग्रामस्थांचीदेखील मदत मिळत आहे. शाळेतील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचा आलेख उंचावत आहे. विद्यार्थ्यांना अधिक दर्जेदार शिक्षण मिळावे, यासाठी जिल्हाधिकारी यांच्याकडून इमारत बांधकाम करण्यासाठी अडीच कोटी, पाण्यासाठी ३० लाख तर शाळेत जाण्यासाठी मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत चार कोटी रुपयांचा निधी वितरीत करण्यात आले आहेत.एकीकडे जिल्हा परिषद शाळेकडे दुर्लक्ष होत असले तरी साखरा येथील जिल्हा परिषद शाळेत प्रवेशासाठी विद्यार्थ्यांची झुंबड उडत असून अद्यापही पाचशे विद्यार्थी प्रवेशासाठी प्रतीक्षेत असून येथे प्रवेश मिळावा यासाठी वाशीम शहरासह परिसरातील वीस ते पंचवीस गावांतील विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. ही बाब स्वागतार्ह असून नक्कीच प्रेरणादायी आहे.

## यशवंत पंचायत राज अभियानाचे पुरस्कार जाहीर,राज्यात यवतमाळ जि.प.प्रथम

**विभागस्तरीय पुरस्कार**

**कोकण – संगमेश्वर (जि.रत्नागिरी), मालवण (जि. सिंधुदूर्ग), शहापूर (जि.ठाणे),**
**नाशिक– राहाता (जि. अहमदनगर), पारोळा(जि. जळगाव), संगमनेर (जि.अहमदनगर),**
**पुणे – अक्कलकोट (जि. सोलापूर), गडहिंग्लज (जि. कोल्हापूर), शिराळा (जि. सांगली),**
**औरंगाबाद– लातूर (जि. लातूर), जळकोट (जि.लातूर), अर्धापूर(जि. नांदेड),**
**अमरावती– शेगाव (जि. बुलडाणा),अचलपूर (जि. अमरावती), खामगाव(जि.बुलडाणा)**
**नागपूर– काटोला (जि. नागपूर), कामठी (जि. नागपूर).कुरखेडा(जि.गडचिरोली) व चंद्रपूर(जि. चंद्रपूर),**
**या पंचायत समित्यांना प्रत्येक विभागात अनुक्रमे ११ लाख रुपये, ८ लाख रुपये आणि ६ लाख रुपये तसेच स्मृतीचिन्ह आणि प्रमाणपत्र वितरीत करण्यात येणार आहे.**

**गोंदिया:** – यशवंत पंचायत राज अभियानांतर्गत नागपूर विभागातून काटोल प्रथम तर कामठी आणि कुरखेडा व चंद्रपूर पंचायत समितीने अनुक्रमे दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार पटकावला आहे.यवतमाळ जिल्हा परिषदेने राज्यस्तरीय अत्युत्कृष्ट जिल्हा परिषदेचा प्रथम पुरस्कार पटकावला असून कोल्हापूर जिल्हा परिषद द्वितीय तर लातूर जिल्हा परिषद तृतीय क्रमांकाच्या पुरस्काराची मानकरी ठरल्याची घोषणा ग्रामविकास विभागाने आज सोमवारी केली. पुरस्कारप्राप्त जिल्हा परिषदांना अनुक्रमे ३० लाख रुपये, २० लाख रुपये आणि १७ लाख रुपये तसेच स्मृतीचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे.

राज्यस्तरीय अत्युत्कृष्ट पंचायत समितीमध्ये प्रथम क्रमांक लातूर (जि. लातूर) पंचायत समितीने, काटोल (जि. नागपूर) पंचायत समितीने द्वितीय तर राहता (जि. अहमदनगर) पंचायत समितीने तृतीय क्रमांक पटकावला. या पंचायत समित्यांसाठी अनुक्रमे २० लाख रुपये, १७ लाख रुपये आणि १५ लाख रुपये तसेच स्मृतीचिन्ह आणि प्रमाणपत्र असे पुरस्काराचे स्वरुप आहे.

यशवंत पंचायत राज अभियान सन २०२२–२३ अंतर्गत हे पुरस्कार आहेत. दरवर्षी यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मदिनी म्हणजे १२ मार्च रोजी या पुरस्कारांचे वितरण करण्यात येते. पण करोनाचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता यंदा या दिवशी हा कार्यक्रम होणार नाही, असे मुश्रीफ यांनी स्पष्ट केले.

ग्रामीण महाराष्ट्राच्या विकासात पंचायत राज संस्थांचे योगदान मोठे आहे. राज्यामधील विकासाच्या प्रमुख योजना पंचायत राज संस्थांमार्फत राबविल्या जातात. पंचायत राज संस्थांना त्यांनी केलेल्या कामगिरीनुसार प्रोत्साहीत करुन त्यांची कार्यक्षमता अधिक वाढविणे आणि त्यांच्यामध्ये उत्कृष्ट कामांची स्पर्धा निर्माण करणे आवश्यक आहे. यासाठी राज्यात पंचायत राज संस्थांचे व्यवस्थापन , विकास कार्यात अत्युत्कृष्ट काम करणाऱ्या जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांना विभागस्तर तसेच राज्यस्तरावर "यशवंत पंचायत राज अभियान" पुरस्कार देण्यात येते.

ग्रामपंचायतींसाठी स्मार्ट ग्राम व्हिलेज योजनेंतर्गत पुरस्कार देण्यात येतात. यशवंत पंचायत राज पुरस्कार निवड करण्यासाठी तालुका, जिल्हा, विभाग आणि राज्यस्तरावर पारितोषिक निवड समितीची स्थापना करण्यात आली होती.

## नवेगाव–नागझिरा व्याघ्र प्रकल्पात ४२३ रानगवे

**गोंदिया** : नवेगाव–नागझिरा व्याघ्र प्रकल्पात कोणत्याफ प्राण्यांची किती संख्या आहे, हे याची मोजदाद करण्यासाठी ३ जून रोजी आटोपलेल्या वन्यप्राणी गणना निसर्गानुभव–२०२३ चा अहवाल आला आहे. यामध्ये सर्वाधिक ४२३ रानगव्यांची नोंद घेण्यात आली आहे. हे तर दुसऱ्या क्रमांकावर रानडुकरांची नोंद घेण्यात आली आहे. हे या आकडेवारीवरून मात्र नवेगाव–नागझिरा हे जरी व्याघ्र प्रकल्प असले तरी ते रानगव्यांनीच ङ्गकॅप्चरफ केले आहे, असे म्हणणे वावगे ठरणार नाही.



वन्यप्राण्यांसाठी राखीव करण्यात आलेल्या जंगलांमध्ये कोणत्या प्राण्याची किती संख्या आहे याची मोजणी करण्यासाठी दरवर्षी वन्यप्राणी गणना केली जाते. दरवर्षी बुद्ध पौर्णिमेच्या दिवशी ही वन्यप्राणी गणना केली जाते. मात्र यंदा बुद्ध पौर्णिमेच्या सप्ताहात सलग पाऊस बरसला व त्यामुळे ५ मे रोजी वन्यप्राणी गणनेचा कार्यक्रम रद्द करण्यात आला. त्यानंतर वन्यप्राणी गणनेचा कार्यक्रम ३ जून रोजी घेण्यात आला. या मध्ये नवेगाव–नागझिरा व्याघ्र प्रकल्पातील पाणवठ्यांवर हा वन्यप्राणी गणना निसर्गानुभव कार्यक्रम घेण्यात आला होता. या वन्यप्राणी गणनेत सहभागी झालेल्या स्वयंसेवक व वनकर्मचाऱ्यांकडून त्यांना दिसणाऱ्या वन्यप्राण्यांची नोंद घेण्यात येते. त्यानुसार, घेण्यात आलेल्या नोंदींचा अहवाल आला आहे.

या अहवालानुसार, नवेगाव–नागझिरा व्याघ्र प्रकल्पात सर्वाधिक संख्या रानगव्यांची दिसत आहे. कारण, अहवालात सर्वाधिक ४२३ रानगव्यांची नोंद घेण्यात आली आहे. त्या नंतर दुसऱ्या क्रमांकावर २१९ रानडुकरांची, तिसऱ्या क्रमांकावर ११९ ठिपके असलेल्या हरणांची तर चवथ्या क्रमांकावर १७७ वानरांची नोंद घेण्यात आली आहे. यानंतर अन्य उर्वरित वन्यप्राण्यांची शंभरच्या आत नोंद असून एकूण १२८४ विविध वन्यप्राण्यांची नोंद घेण्यात आली आहे.

**वाघोबाचे दर्शनच नाही**

**नवेगाव–नागझिरा व्याघ्र प्रकल्पात वाघांची संख्या मोठ्या प्रमाणात असून त्यात आता दोन वाघिणींना सोडण्यात आले आहे. हे विशेष म्हणजे, जंगल सफारीसाठी जाणाऱ्या पर्यटकांनाही वाघोबा दर्शन देत असल्याने पर्यटकांची संख्या वाढल्याचे ऐकिवात आहे. असे असतानाच वन्यप्राणी गणनेत एका ही वाघोबा ने दर्शन दिले नसल्याचे दिसते. कारण, वन्यप्राणी गणनेच्या अहवालात एका ही वाघाची नोंद घेण्यात आलेली नाही . मात्र १२ बिबट्यांची नोंद आहे. ताज्या महाराष्ट्र शहर राष्ट्रीय क्रिकेट मनोरंजन संपादकी आपला ब्राझिंगचा अनुभव अधिक चांगला व्हावा, तुम्हाला तुमच्या आवडीच्या मजकुराची शिफारस करता यावी, यासाठी ही वेबसाईट कुकी किंवा तत्सम तंत्रज्ञान वापरते. आमची वेबसाईट वापरणं सुरू ठेवून आपण आमच्या गोपनीयता धोरणाला आणि कुकी धोरणाला सहमती देता .**

**७० मचाणांवरुन झाली वन्यप्राणी गणना**

**वन्यप्राणी गणनेसाठी नागझिरा पिटेझरी, उमरझरी व कोका येथे ७० मचाण तयार करण्यात आले होते. तर या वन्यप्राणी गणनेत १४२ स्वयंसेवकांनी भाग घेतला होता. एका मचाणावर दोन स्वयंसेवक व वनकर्मचारी असे नियोजन करण्यात आले होते. वन्यप्राणी गणनेमुळे व्याघ्र प्रकल्प पर्यटकांसाठी बंद ठेवण्यात आले होते.**

## पावसामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदतीसाठी १५०० कोटी रुपयांस मंजुरी

**मुंबई,**–गेल्या वषी सततच्या पावसामुळे झालेल्या नुकसानीमुळे बाधित शेतकऱ्यांना १५०० कोटी रुपयांची मदत देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. सुमारे १५.९६ लाख हेक्टर बाधित क्षेत्रातील २७.३६ लाख शेतक?यांना ही मदत देण्यात येईल.सततचा पाऊस ही राज्य शासनामार्फत नवीन आपत्ती घोषित करुन मदत देण्याबाबत मंत्रिमंडळाच्या ५ एप्रिल रोजी झालेल्या बैठकीत निर्णय घेण्यात आला होता. त्याप्रमाणे शेतीपिकांच्या नुकसानीकरिता राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या सुधारित दराने व निकषानुसार मदत देण्याचा निर्णय घेतला आहे.

केंद्र शासनाने राज्य आपत्ती प्रतिसाद निधीचे दर सुधारित केले आहेत. त्यानुसार जिरायत पिकांच्या नुकसानीसाठी प्रतिहेक्टर ८५०० रुपये, बागायत पिकांच्या नुकसानीसाठी १७ हजार रुपये प्रति हेक्टर आणि बहुवार्षिक पिकांच्या नुकसानीसाठी २२५०० रुपये प्रति हेक्टर अशी २ हेक्टरच्या मर्यादेत ही मदत देण्यात येईल.

कंत्राटी ग्रामसेवकांच्या मानधनात १० हजार रुपये एवढी वाढ करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. सध्या या ग्रामसेवकास ६ हजार रुपये दरमहिना मिळतात, आता ते १६ हजार एवढे मिळतील.

## रात्रगस्तदरम्यान दोन पोलिसांना मारहाण



**गोंदिया :** अवैध गौणखनिजाची वाहतूक करणाऱ्या आरोपींनी आमगाव पोलीस ठाण्यातील दोन पोलीस कर्मचाऱ्यांना मारहाण केली. या घटनेमुळे जेथे पोलीसच सुरक्षित नाही तिथे सामान्यांचं काय, असा प्रश्न उपस्थित होत आहे. ही घटना रविवारी रात्री आमगाव तालुक्यातील भोसा येथे घडली. याप्रकरणी पाच आरोपींना अटक करण्यात आली आहे.

आमगाव तालुका मध्यप्रदेश आणि छत्तीसगड राज्यांच्या सीमेला लागून असल्याने या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर अवैध धंदे होत असतात. या अवैध धंद्यांना आळा घालण्यासाठी गोंदिया जिल्हा पोलीस प्रशासन प्रयत्नरत आहे. रविवारी रात्री विजय चुनीलाल कोसमे व प्रवीण मोगरे हे रात्रगस्त करीत होते. अवैध गौणखनिजाची वाहतूक करणाऱ्या आरोपींनी त्यांच्यावर हल्ला केला. पोलिसांना मारहाण, शिविगाळ करीत त्यांचा मोबाईलही हिसकावून घेतला.माहिती मिळताच इतर पोलीस कर्मचारी घटनास्थळी पोहोचले. पोलिसांना पाहताच आरोपींनी पळ काढला. जखमी पोलिसांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला. याप्रकरणी भुमेश्वर बुधराम ब्राह्मणकर, सुनील भुमेश्वर ब्राह्मणकर, अनिल भुमेश्वर ब्राह्मणकर, मनोहर फरकुंडे, संतोष ब्राह्मणकर या पाच आरोपींना अटक करण्यात आली. पुढील तपास सुरूआहे.

## जिल्हा परिषदेत टक्क्याकरीता होऊ लागले संबधित विभागातून फायनल बिल व रजिस्टर गायब ?



गोंदिया:– गोंदिया जिल्हा परिषदेच्या स्थापनेला २४ वर्ष पूर्ण होऊ घातली असताना या २४ वर्षातील पदाधिकारी व जिल्हा परिषदेच्या कार्यकाळाकडे नजर फिरविल्यास विद्यमान पदाधिकारी यांच्या कार्यकाळापेक्षा कितीतरी अधिक पटीने चांगले होते, अशाच शिक्का मारुन जाईल.जिल्हापरिषदेवर आजपर्यंत काँग्रेस आणि भारतीय जनता पक्षाची मिळून सरकार राहीली.यात भारतीय जनता पक्षाला दोनवेळा जिल्हा परिषद अध्यक्ष पदाचा मान पुर्वी मिळाला.मात्र त्यांच्या कार्यकाळात कुठल्याच कंत्राटदारालाच काय पक्षाच्या कार्यकर्त्याला सुध्दा मोठी रक्कम किंवा कमीशन दिल्याशिवाय काम मिळत नव्हते असे चित्र क्वचितच बघावयास मिळत होते. मात्र आत्ता तर काम विकत घेतल्यानंतरही शेवटचा बिल जेव्हा निघायची वेळ येते,तेव्हा संबधित विभागातूनच त्या बिलासह नोंदणी रजिस्टर एका वरिष्ठ अधिकारी यांच्या आशिर्वादाने जिल्हा परिषदेचे पदाधिकारी आपल्या ताब्यात घेत शासन नियमाला तिलाजंली देत असल्याचे बोलले जात आहे.

काम पुर्ण केल्यानंतर फायनल बिल काढण्याच्यावेळी तडज़ोडीकरीता तो नोंदणी रजिस्टर व अंतिम बिल आपल्या ताब्यात घेण्याची नवी स्किम जिल्हा परिषदेने लागू केल्याने जिल्ह्यातील भाजपच्याच नव्हे तर इतर पक्षाच्या कंत्राटदार असलेल्या कार्यकर्त्यामध्ये नाराजीचा सूर येऊ लागला आहे.यातील काहीं तर आपली व्यथा मांडताना अक्षरक्षा ढसाढसा रडायलाही लागले होते.व्यापारी व सावकाराकडून कर्ज घेऊन ३० टक्के,३५ टक्के,२५ टक्के बिलोमध्ये काम घेतल्यानंतरही संबधित विभागाचे मुख्यालयात बसलेले अधिकारी व काही जिल्हा परिषदेचे पदाधिकारी हे आपल्या काही निवडक कंत्राटदारामार्फेत जोपर्यंत त्या कामाच्या ५ ते १५ टक्के कमीशन मिळत नाही,तोपर्यंत वर्कआर्डरही देत नाही अशी अवस्था असल्याचे बोलले जात आहे.विशेष म्हणजे भाजपचे आमदार सोड संघटन मंर्त्याकडेही याबाबतीत तक्रार करुनही काही उपयोग होत नसल्याचेही कंत्राटदार भाजप कार्यकर्ते दबक्या आवाजात बोलू लागले आहेत.जिल्हा परिषदेत विशिष्ठ व मोजक्या लोकांकरीताच कामांच्या निविदा मॅनेज केल्या जात असून कुणी आपल्या प्रयत्नाने काम मि?वित असेल तर त्या कामात अडचणी निर्माण करुन आपल्या त्या खास मोजक्या लोकांनाच काम मिळेल यासाठी प्रयत्न होत असल्याचेही बोलले जात आहे.

गोंदिया जिल्हा परिषदेचा मार्च एंडीग हा जून महिन्यात बंद होत असल्याने लघु सिंचन विभागाच्यावतीने मागच्या आर्थिक वर्षात म्हणजे २०२२–२३ मध्ये काम झालेल्या कामांचे अंतिम देयके काढण्यासाठी ३१ मार्चनंतर या विभागाला मदुतवाढ देण्यात आली होती.२९ व ३० मे २०२३ रोजी जिल्हा परिषदेच्या लघुसिंचन विभागाकडे असलेल्या कामांचे देयके सादर करण्यासाठी वित्तविभागाने साईट ओपन करुन दिली होती.त्यानुसार त्यांच्याकडे असलेल्या अंदाजे २१ कामांचे देयके सादर करणे आवश्यक होते.मात्र त्यापैकी लघुसिंचन विभागाने एका जि.प.पदाधिकारी व एका खास कंत्राटदाराची ८ अशी १०–११ कामेच त्या दिवशी ऑनलाईन करुन फायनल केली.मात्र उरलेली ९–१० कामे मात्र सादरच केली नाही.तर त्या कामांचे नोंदणी रजिस्टरसह बिल लघुसिंचन विभागातून एका जि.प.पदाधिकारी यांच्या कक्षात रवाना करण्यात आले आणि त्या कंत्राटदारांचे बिल थांबले.त्यानी काम केलेल्या पैशातही आपला हिस्सा पुन्हा मिळावा याकरीता तो रजिस्टर व अंतिम देयके बिल लघुसिंचन विभागातून गायब करण्याची परंपरा या नव्या जिल्हा परिषदेत सुरु झाल्याने कंत्राटदार वर्गात नाराजीचा सुर निर्माण झाला आहे.सोबतच काही वरिष्ठ अधिकारी यांना तांत्रिक बाबीचा ज्ञान नसतानाही आपण मोठे असा धाक दाखवूनही बिल व इतर प्रक्रियेत हस्तक्षेप सातत्याने करीत असल्यानेच जिल्हा परिषदेच्या अनेक विभागात गोंधळ सुरु झालेला आहे.यातही गेल्या १ वर्षापुवी ३५ टक्के बिलोमध्ये ३ लाख रुपयाचा भाजप कार्यकर्ता म्हणून घेतलेल्या कामाचे देयके सुध्दा कंत्राटदार असलेल्या एका माजी जि.प.सदस्याला अद्यापही जिल्हा परिषदेचा लघु सिंचन विभाग करु शकलेला नाही,यावरुन या जिल्हा परिषदेत आत्ता कमीशन टक्का हाच एकमेव ध्येय विकासाचा झाल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

## वैद्यकीय महाविद्यालयातील रक्त पेढीत रक्ताचा तुटवडा

**गोंदिया:** गोंदियातील बाई गंगाबाई महीला रुग्णालय व गोंदिया वैद्यकिय महाविद्यालयातील रक्तपेढीमध्ये २०७५ युनिट इतका मोठ्या रक्तसाठ्याची क्षमता असून सुद्धा बुधवार ७ जून २०२३ पर्यंत फक्त ८८ युनिट रक्त साठा उपलब्ध आहे, तर दररोज २० ते २५ युनिट रक्ताच्या पिशव्या रुग्णांसाठी आवश्यक असतात.एप्रिल, मे, जूनमध्ये रक्तदान शिबिरे नगण्य असतात. शाळा – महाविद्यालयांना सुट्या आहेत. रक्तपेढीचे तंत्रज्ञ युवराज जांभुळकर यांनी सांगितले की, ७ जून पर्यंत बी पॉझिटिव्ह, एबी पॉझिटिव्ह, ओ निगेटिव्ह, ए निगेटिव्ह, बी निगेटिव्ह, एबी निगेटिव्ह रक्त फार कमी उपलब्ध आहे, तर अर्ध्याहून अधिक साठा (५१ युनिट्स) ओ पॉझिटिव्ह युनिटचा आहे. अशा परिस्थितीत या पुण्य कार्यात सर्वांनी सहभागी होण्याची गरज आहे.

अवघ्या १५ हजार , १६ हजार रुपये मानधनावर काम करणा?या सामाजिक कार्यकर्त्यांच्या सेवा बंद करून गोंदिया वैद्यकिय महाविद्यालय मधून ६० ते ७० हजार रुपये दरमहा मानधनावर नवीन सामाजिक कार्यकर्त्यांची नियुक्ती करण्यात आली, त्यानंतर रक्त उपलब्ध होईल, अशी आशा निर्माण झाली होती. त्यांच्या नियुक्ती मुळे रक्तपेढीत कधी ही रक्ताचा तुटवडा भासणार नाही, पण घडले याउलट, आज गोंदियातील शासकीय रक्तपेढीत रक्ताचा तुटवडा असून केवळ ४ दिवसांचा साठा शिल्लक आहे.

याविषयी रक्तपेढीचे प्रभारी डॉ. माहुले म्हणाले– सध्या गोंदिया वैद्यकिय महाविद्यालय तर्फे ९ समाजसेवकांची नियुक्ती करण्यात आली होती, आम्ही त्यांना या तुटवडा बद्दल कारणे दाखवा अशी पत्रे दिली आहेत. यातील दोन सामाजिक कार्यकर्ते सुटीवर असून, दोन सामाजिक कार्यकर्त्यांची अन्य ठिकाणी बदली करण्यात आली असून, उन्हाळी हंगाम व शाळा–कॉलेजच्या सुट्या हे रक्तदानाचा वेग कमी होण्याचे कारण असल्याचे त्यांनी सांगितले. गोंदिया शहर व परिसरातील, जिल्ह्यातील सामाजिक संस्था, सामाजिक कार्यकर्तना रक्तदान करण्याचे आवाहन करून रक्तदान शिबिरे आयोजित करण्याची विनंती केली आहे असे ही त्यांनी सांगितले.

## संपादकीय

### जातीय-धार्मिक सलोखा कायम हवाच

नांदेड जिल्ह्यात बोंढार हवेली या गावातील अक्षय भालेराव या दलित तरुणाची काही मराठा तरुणांनी निर्घृण हत्या केली.त्यामुळे राज्यात वेगवेगळ्या प्रकारच्या प्रतिक्रिया उमटत आहे.काही प्रतिक्रिया संयमी आहेत तर काही प्रतिक्रिया समाजमन भडकविणाऱ्या आहेत.त्यामुळे अशी संवेदनशील प्रकरणे कशी हाताळावी हे अजूनही जर सामाजिक, पुरोगामी चळवळीत काम करणाऱ्या लोकांना समजत नसेल तर फुले–शाहू–आंबेडकरांचा जयजयकार हा केवळ नावापुरताच आहे असेच म्हणावे लागेल.अक्षय भालेराव या तरुणाची हत्या ही अतिशय घृणास्पद घटना असून मानवतेला काळीमा फासणारे कृत्य आहे. त्यामुळे ज्यांनी हे क्रौर्य केले त्यांना लवकरात लवकर अत्यंत कठोर शिक्षा झाली पाहिजे असे आमचे मत आहे. परंतु या प्रकरणाला जाणूनबुजून जातीय रंग देऊन वातावरण खराब करणे म्हणजे जात्यांध आणि धर्मांध लोकांच्या हातात आयते कोलीत देण्यासारखे आहे. सध्या देशात सगळीकडेच जातीय आणि धार्मिक विद्वेष निर्माण करणाऱ्या घटना दररोज घडत आहे आणि त्या घडवून आणण्यासाठी एक सूत्रबद्ध यंत्रणा नियोजनपूर्वक काम करीत आहे.कारण पुढील एक वर्षात राज्यात आणि देशात निवडणुकांचे वारे वाहायला लागणार आहे. अशावेळी मतांचे ध्रुवीकरण करण्यासाठी जातीचा आणि धर्माचा वापर जोरात होणार आहे. त्यासाठी वैयक्तिक कारणावरुन जरी एखादे प्रकरण घडले तरी त्याला जातीचे आणि धर्माचे स्वरूप देऊन वातावरण चिघळविण्याचा प्रयत्न केला जात आहे.

नांदेड जिल्ह्यात घडलेली घटना ही अतिशय निषेधार्य आहे. महाराष्ट्र हा शिव–फुले–शाहू–आंबेडकरांचा म्हणून ओळखला जातो. महाराष्ट्राला प्रबोधनाची फार मोठी परंपरा आहे. अनेक सामाजिक चळवळी महाराष्ट्रामध्ये वैचारिक प्रबोधन करून समाजामध्ये जातीय–धार्मिक सलोखा निर्माण करण्याचा सातत्याने प्रयत्न करीत असतात.अनेक वर्षापासून आंबेडकरी चळवळीने लोकांना जागृत करण्यामधे महत्त्वाची भूमिका निभावलेली आहे. त्याचबरोबर मागील ३२ वर्षापासून मराठा सेवा संघाने महाराष्ट्रात आपल्या वैचारिक प्रबोधनातून फार मोठे सामाजिक परिवर्तन घडवून आणले आहे. महाराष्ट्रातील जातीय आणि धार्मिक दंगली कमी होण्यामधे मराठा सेवा संघाचा फार मोठा वाटा आहे व तसा गुप्तचर यंत्रणेचा सुद्धा अहवाल आहे. मराठा आणि ओबीसी समाजाच्या घरामधे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना सन्मानाने पोहोचविण्यात आणि बाबासाहेबांना आपले प्रेरणास्त्रोत मानण्यात मराठा सेवा संघाने खूप महत्त्वाची भूमिका निभावलेली आहे. तसेच मुस्लिमांच्या डोक्यात छत्रपती शिवाजी महाराजांना सन्मानपूर्वक घुसविण्यात सुध्दा मराठा सेवा संघाने फार मोठे कार्य केले आहे. अशावेळी एखाद्या प्रकरणावरून मराठा सेवा संघाला डिवचणे व त्यांच्या प्रबोधनावर प्रश्नचिन्ह निर्माण करणे बरोबर नाही. हे प्रकरण घडल्यानंतर सुद्धा मराठा सेवा संघाचे संस्थापक ॲड. पुरुषोत्तम खेडेकर यांनी ताबडतोब या घटनेचा निषेध केला असून आरोपींना कठोर शिक्षा करण्याची मागणी केली आहे.तसेच संभाजी ब्रिगेडने सुद्धा जाहीर निषेध करून अशाच प्रकारची मागणी जाहीरपणे केलेली आहे. परंतु काही आततायी लोक सोशल मीडियावर हे प्रकरण आणखी ताणून धरण्याचा व त्याला जातीय रंग देण्याचा प्रयत्न करीत आहे.त्यामुळे जवळ आलेली मने पुन्हा एकमेकांपासून दूर जाण्याचा धोका निर्माण झालेला आहे.मनुवादी प्रवृत्तीच्या लोकांनी रचलेल्या जाळ्यात आपण स्वतःहून फसण्याचा हा प्रकार आहे. चळवळीत अनेक वर्षापासून जर आपण काम करीत असू तर अशी प्रकरणे अत्यंत शांत डोक्याने आणि संयमाने हाताळली पाहिजे. आपल्या एखाद्या वक्तव्यातून किंवा कृत्यातून मनुवादी लोकांना आयती संधी उपलब्ध करून देणे हे पुरोगामी चळवळीसाठी घातक आहे.

आपला देश आधीच जातीय–धार्मिक स्वरुपाच्या घटनांनी होरपळून निघत आहे. लोकांना एकमेकांपासून दूर नेण्याचे व फूट पाडण्याचे प्रयत्न दररोज होत आहे.केवळ स्वतःच्या स्वार्थी राजकारणासाठी माणसांना माणसांपासून तोडले जात आहे.जात–धर्म विसरुन निरपेक्ष भावनेने एकमेकांवर प्रेम करणाऱ्या लोकांमधे दरी आणि दूरी निर्माण करण्यासाठी काही लोक टपून बसलेले आहेत.वैयक्तिक प्रकरणांना जातीय–धार्मिक स्वरूप देण्यात इलेक्ट्रॉनिक्स मीडिया अग्रेसर आहे. सिलेक्टीव प्रकरणांना मीडिया जोरदार प्रसिद्धी देते आणि देशात वातावरण खराब करते.ज्या प्रकरणांना प्रसिद्धी द्यायची ती प्रकरणे मात्र दाबून टाकते.त्यामुळे छत्रपती शिवराय आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना मानणाऱ्या त्यांच्या अनुयायांनी अतिशय सावध असणे गरजेचे आहे. मागील २५–३० वर्षात या दोन्ही महापुरुषांचे अनुयायी एकमेकांच्या हातात हात घालून चांगल्या प्रकारे समाज जोडण्याचे कार्य करीत आहेत. एकमेकांच्या विचार मंचावर जाऊन व समाजाचं प्रबोधन करून लोकांना संघटित करीत आहे. ही अतिशय चांगली बाब असून संतांची व महापुरुषांची महान परंपरा असलेल्या महाराष्ट्रासाठी ही आशादायी गोष्ट आहे. अशावेळी जर असे एखादे प्रकरण घडले तर ते प्रकरण दोन्ही बाजूच्या मंडळींनी तेवढ्याच गांभीर्याने आणि एकत्र बसून शांततेने हाताळणे गरजेचे आहे. अशा प्रकरणातून आपल्या एकीत कुठेही बाधा येणार नाही व आपली वैचारिक मैत्री दुभंगणार नाही याची काळजी दोन्ही बाजूने घेणे गरजेचे आहे.तेव्हाच कुठे शिव–फुले–शाहू–आंबेडकरांचा हा महाराष्ट्र पूर्वीप्रमाणे देशाला दिशा देऊ शकेल.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे छत्रपती शिवाजी महाराजांसोबत वैचारिक नाते होते.राजर्षी शाहू महाराज,सयाजीराव गायकवाड,केळुस्कर गुरुजी यांनी सुद्धा बाबासाहेबांच्या बुद्धिमत्तेला सलाम करून त्यांना सहकार्याची भूमिका त्या काळात घेतलेली होती. त्यामुळे या दोन समाजाचा पूर्वीपासूनच एकमेकांसोबत अतिशय चांगला ऋणानुबंध आहे.असे असताना काही लोकांना हे प्रेमाचे व आपुलकीचे संबंध पाहवत नसल्यामुळे ते अशा प्रकरणांना जास्तीत जास्त कसे पेटवता येईल याचा प्रयत्न करीत असतात.परंतु आपण अशा कुटिल कारस्थानांना बळी न पडता आपल्या राज्याची शांतता भंग होणार नाही यासाठी सामाजिक चळवळीतील कार्यकर्ते म्हणून आपली भूमिका अतिशय महत्त्वाची आहे. तीच सलोख्याची भूमिका दोन्ही बाजूच्या लोकांनी पार पाडावी व जातीयवादी शक्ती विरुद्ध एकत्रितपणे लढा द्यावा आणि महाराष्ट्र एकसंघ व शांत ठेवावा असे सुचवावेसे वाटते.

**प्रेमकुमार बोके**
अंजनगाव सुर्जी

# अकोट तालुक्यातील सत्यशोधक चळवळ



**सतीश जामोदकर**
**हिवरा बु.मानोरा, वाशिम मो.९४२३३७४६७८**

जुना अकोला जिल्ह्यात अकोट तालुक्यात तेल्हाा तालुका होता. या तालुक्यात सत्यशोधक समाज महाधटशास्त्री यांच्यामुळेच आला. अकोट येथील शाखेचे सेक्रेटरी होते. एस.एस. खाजोने यांचे करजगावकरांशी नाते संबंध असल्याचे दिसते. अकोट येथे ९/११/१९१४ रोजी सायंकाळी ६ ते ८ वाजेपर्यंत प्रख्यात साधु श्री नरसिंग महाराज यांच्या यात्रेनिमित्त सत्यशोधक समाजाची सभा भरली होती. या सभेत राणीच्या तसबरींना पुण्यहारांनी सुशोभित केले होते. कैलासगीरीबुआ अंजलगावकर यांना अध्यक्षस्थान देण्यात आले होते. अकोला येथील सत्यशोधक समाजाचे सेक्रेटरी श्रीयुत पतसरामल, तुकारामजी पांचाळ वातुलकर यांनी सार्वभौम बादशहा पंचम यांच्यावर अलोला दुर्धर प्रसंग टळावा म्हणून परमेश्वराचे आभार मानून सत्यशोधक समाज म्हणजे काय? व ब्राम्हण कोणास म्हणावी या दोन विषयावर दोन तास सुरस भाषण केले. सभेस पंधरावीस गावाचे लोक उपस्थित होते. या सभेत आलेल्या मंडळीचे जराम रावजी बनसोडे, आकोटकर यांनी आभार मानले. समाजाचे मेंबर निवडण्यात आले. त्यामध्ये श्री साधू जामाजीबुवा शेगावकर, श्री साधू बापुजी बुवा टाकसुजोकर, श्रीयुत लक्ष्मणराव वारीक सुर्जीकर,श्रीयुत ससारामजी वडेगावकर, श्री बापुजी नाईक दैवज आकोटकर, श्री नथ्थुजी कान्हेरीकर, श्री लक्ष्मणराव वडेगावकर, श्री बाबुजी नाईक दैवत आकोटकर, श्री चिंधाजी आकाजी तेली आकोटकर, श्री मारुती विठोबा आसरकर अकोट, श्री नारायण अकर्ते अकोट, याप्रमाणे मेंबर निवडण्यात आले. (दीनमित्र २६ माहे डिसेंबर १९१४, एस.एस.खानोजे)

अशाच प्रकारची दुसरी सभा अकोट येथे ०६/०७/१९१४ ला भरल्याची दिसते. येथील नानासाहेब यांचे मंदिरात आषाढीच्या गुरुपूजनाचा कार्यक्रम गुरुवर्य श्री साधू मारुती बुआ यांनी स.शो. समाजाचे नियमाप्रमाणे केला होता. श्रीयुत नारायणराव जानराव शेगोकार माळी यांचे हस्ते नानासाहेब व संत शिरोमणी यादोजी महाराज यांची पूजाविधी केली होती. हे कृत्य भुदेवाचे आहे त्यामुळे इतरांना अधिकार नाही म्हणून वतनदार कुळकर्णी यांनी ब्राम्हणातर्फे मंदिरात जाऊन अग्नीदेवतेचा प्रति अवतार बनून अपशब्दांचा भडीमार साधू मारुती बुआ यांच्यावर केला होता. म्हणजे कोणताही विधी आमच्या शिवाय करु नये असे त्यांनी शाप–शिव्या देऊन सांगितले. (दिनमित्र १५ जुलै १९१४) त्याचप्रमाणे अकोट येथे जन्मकुंडली वगैरे सर्व प्रकारचे (त्यावेळी लोक ब्राम्हणांच्या हस्ते काढून घेत)कार्य सत्यशोधक समाजाचे सेक्रेटरी एस.एस.खाजोने यांनी गरजूंना करुन देईल म्हणून आवाहन केले होते.

याच अकोट मध्ये १५ व १६ एप्रिल १९१४ रोजी सत्यशोधक समाजाची सभा झाली होती. अध्यक्षस्थानी श्रीयुत जयरामजी बेलोरकर हे होते. प्रथम इंग्रज सरकारचे नावाने जयजयकार होऊन राजा व राणी यांच्या तसमिरीस पुष्पहार घालण्यात आला. नंतर रा. यशवंतराव मिस्त्री यांनी सत्यशोधक समाजाचे जनरल सेक्रेटरी व उपदेशक श्रीयुत मोतीरामजी वानखडे करजगावकर यांची ओळख करुन दिली. वानखडे यांनी शिक्षण व सत्यशोधक समाज यावर सुमारे ३ तास भाषण केले. सभेचे व्थवस्थेकरिता जोशी पोलीस इन्स्पेक्टर व अकोटचे भय्यालाल सन इन्स्पेक्टर हे होते. या सभेला तीन हजार मंडळी उपस्थित होती.

दुसऱ्या दिवशी सत्यशोधक समाजाचे उपदेशक शास्त्री नारोबाबाजी महाधट ओतुरकर यांचे विद्या व सत्यशोधक समाजापासून फायदे या विषयावर व्याख्यान झाले. त्या दिवशी सुमारे साडेतीन हजारावर मंडळी उपस्थित होती. सभेची व्यवस्था नारायणराव गोरडे, खाजोने, देऊळवाले बुवा बंदसोड वगैरे मंडळींनी ठेवली होती. नानासाहेब यांच्या मंदिरासमोर बत्त्यांची आरास लागली होती. एका बाईने दोन हजार रुपये या सभेसाठी दिले होते. (दीनमित्र २७ मे १९१४) अशाप्रकारे अकोट येथे १९१४ साली सत्यशोधक समाजाने जागृती केली होती.

रिरसोली येथे रा. गणु मानसिंग यांच्या वाड्यात अविनाश गुरु मणेशगीर बाबा नेर धामणेकर यांच्या अध्यक्षतेखाली शास्त्री नारोबाबाजी यांचे भाषण झाले होते. तर भोकर ता.अकोट येथे सत्यशोधकांच्या सभेत वादावादी होऊन रामनद्र भटाला महाधर शास्त्री यांनी सप्रमाण उत्तरे देऊन गप्प बसविले होते. तर नेर सोनाळे येथे खुशाल गुरु गणेशगीर बाबा यांच्या अध्यक्षतेखाली सभा झाली होती. नारोबाबाजी यांचे भाषण झाले होते. (अकोला जिल्ह्यातील सत्यशोधक चळवळीचा इतिहास–१३ जाने १९९९, पारस डॉ. अशोक चोपडे) अकोला जिल्हा ब्राम्हणेत्तर परिषद ३ व ४ जून १९२० रोजी अकोट येथे झाली होती.२८ व २९ डिसेंबर १९२२ साली गुरुवार–शुक्रवार रोजी आकोट येथे दीनमित्र पत्राचे संपादक सत्यशोधक मुकुंदराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बारावी माळी शिक्षण परिषद मोठ्या उत्साहाने साजरी झाली होती. दैनकैवार नावाचे छोटेसे पुस्तक सत्यनाथ रामनाथ इंगळे यांनी छापले होते. त्यास अकोट तालुक्यातील बापुसाहेब सदाशिवराव तानकाजीराव रौंदळेकर यांनी मदत केली होती. मुंडगाव ता. अकोट येथील नित्यानंदन विठोजी मोहिते यांनी शिवाजीचे गुरु कोण हे पुस्तक केशवराव जेधे यांचे हस्ते १९४० साली शिवाजी मराठा हायस्कूलमध्य प्रकाशित केले होते. अकोड तालुका सत्यशोधक परिषद दापुरा. ता. अकोट येथे ४ व ५ जानेवारी १९२५ ला गणपतराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झाली. (संदर्भ ३ भा)

अकोट जवळील मच्छींद्रखेड येथे ता.१३ मे १९२४ रोजी अर्जुनराव पाटील यांचे श्री शाहू महाराजांचा वेदाधिकार या विषयावर भाषण झाली होती. (विजयी मराठा, २६ मे १९२४, गणपतराव पाटील) अकोट तालुक्यातील अकोळी येथील गाणुजी खताडे कार्य करीत होते. अकोट तालुक्यात पुंडा येथे सत्यनायणाजी पूजा सत्यशोधक मतानुसार करण्यात आली. पुरोहितांची कामे पंढरीनाथ जायले व मारोती कुलटे यांनी केले. (विजयी मराठा, २ सप्टेंबर १९२९) या गावी १९०७ साली सत्यशोधक समाज स्थापन झाला. पुरोहित वर्ग काढून वेदोक्त व पुराणोक्त विधी व याप्रमाणे ज्योतीष विषय शिकविण्यात येईल व नंतर इतर मंत्रविधी शिकविले जाई. अस्पृश्य वर्गाला तलावात पाणी भरण्यास मोकळीक होती. अस्पृश्यांच्या घरी सत्यनारायण वगैरे करण्यात आले. सत्यशोधक मनाची मंडळज़ी गावात बरीच आहे. हल्ली मुख्य कार्यकर्ते व अध्यक्ष नामदेव नंदाजी क्षत्रीय मराठा हे असून पंढरी गणपत क्षत्रीय हे सेक्रेटरी आहेत. (सत्यशोधक हीरक महोत्सव ग्रंथ–१९३३, पृ.१७६), हे गाव सावरा ता दर्यापूर अकोट या राज्य महामार्गावर अकोटपासून साधारण विस किलोमीटर तर सावरा या गावापासून जवळपास १० किलोमीटर अंतरावर असून जातांना कवळा बु व आसेगाव हे गावे लागतात.

गावाची लोकवस्ती साधारण ५ हजाराच्या जवळपास असून येथे चैत्र पोर्णिमेला यात्रा भरते. येथील नामदेव नंदाजी क्षत्रीय मराठा यांचे आडनाव पुंडकर होते. त्यांनी तलावाची मान्यता मुंबईवरुन ब्रीटीश सरकारकडून आणली होती. ती अस्पृश्यांकरिता खुला केला होता. मोतीराम रामचंद्र कोपदे यांच्या माहितीवरुन ०३,११, २०१६ ला पुंडा या गावी भेट दिली असता मिळालेली माहिती, सोबत अस्तित्व जामोदकर) अशाप्रकारे अकोट तालुक्यात सत्यशोधक समाज कार्यरत असल्याचा दिसून येतो.

# फडणवीसांची तीच काडी आणी तोच गु!

महाराष्ट्रात एक प्रसिद्ध म्हण आहे! “”तीच काडी आणी तोच गु चिवडत बसणे!” निवडणूका जवळ आल्यात की हा चिवडण्याचा धंदा जोरात सुरु होतो. मंडल पर्व शिखरस्थ असतांना नव्वदीच्या दशकात ओबीसींचे ब्राह्मणीकरण करुन निवडणूका जिंकण्याचा प्रयत्न संघ–भाजपा करीत असे! राममंदिराचा सांस्कृतिक मुद्दा वापरुन हिंदू–मुस्लीम दंगली घडवणे व त्यातून निवडणुका जिंकण्याचा फंडा काही काळ यशस्वी होतांना दिसला. मात्र जातीव्यवस्था ही चिवट असल्याने जात–जाणिवा धर्मकारणावर नेहमीच मात करीत असतात. त्यामुळे अनेकवेळा निवडणूका जिंकण्यासाठी धर्मकारण निकामी होतांना दिसते. अशावेळी निवडणूका जिंकण्यासाठी नवनवे फंडे शोधण्याचे काम संघ–भाजपा करीत असते.

२००९ नंतर ओबीसी जनगणनेचे आंदोलन संसदेत पोहचल्यामुळे ओबीसी जातींनी धर्मकारणावर मात करुन आपले ओबीसीकरण गतिमान केले. ओबीसीकरणाची लाटच देशभर पसरली. ही ओबीसी व्होटबँक लुटण्यासाठी २०१४ साली संघ–भाजपाने ओबीसी मोदीच्या नेतृत्वाखाली दरोडा टाकला. परंतू मुखवटा तो मुखवटाच असतो. मुखवटा घालून ओबीसींना नेहमीच फसवले जाऊ शकत नाही. म्हणून २०१९ सालच्या निवडणूका जिंकण्यासाठी मराठा आरक्षणाचा मुद्दा उकरुन काढण्यात आला. ओबीसी विरुद्ध मराठा असा संघर्ष पेटवून निवडणूका जिंकण्याचा प्रयत्न झाला. आता पुन्हा २०२४ च्या निवडणूका जिंकण्यासाठी मराठा आरक्षणाचे मढे उकरुन काढले जात आहे.

वास्तविक सुप्रीम कोर्टाने ५ मे २०२१ रोजी जजमेंट देउन मराठा आरक्षणाचा पोपट कायमस्वरुपी मारुन टाकलेला आहे. परंतू तरीही या मेलेल्या पोपटाचे मढे पुन्हा पुन्हा उकरुन काढले जात आहे. एक महिन्यापूर्वी जात पडताळणी करणाऱ्या अधिकाऱ्यांना मंत्रालयातून आदेश देण्यात आले की, मराठयांना कुणबी–मराठा व मराठा–कुणबी असे प्रमाणपत्र देण्यात यावे. एकदाका जातप्रमाणपत्रावर कुणबी शब्द आला की, त्याचा आडोसा घेऊन ओबीसीमध्ये घुसखोरी करता येईल, असा हा गंधा धंदा आहे! प्रत्येक जिल्ह्यातील ओबीसी संघटनांनी, ओबीसी कार्यकर्त्यांनी एक शिष्टमंडळ तयार करुन जिल्हाधिकाऱ्यांना, जातपडताळणी समितीच्या सक्षम अधिकाऱ्यांना यासंबंधीचे निवेदन देण्यात येणार आहे.

निवेदनात स्पष्टपणे लिहियचे आहे की, मराठ्यांना “मराठा–कुणबी वा कुणबी–मराठा किंवा कुणबी”असे प्रमाणपत्र देणे म्हणजे सुप्रीम कोर्टाचा अवमान करणे होय! अशा अधिकाऱ्यांवर सुप्रीम कोर्टाचा अवमान केला

### मराठा आरक्षणाच्या निमित्ताने

म्हणून खटले दाखल करण्यात येतील व फौजदारी गुन्हे दाखल करून अटक करण्यात येईल. अजूनही ज्या जिल्ह्यात असे निवेदन दिले नसल्यास ते ताबडतोब द्यावे!

या सर्वांवर कडी म्हणजे परवा २९ मे रोजी महाराष्ट्र सरकारतर्फे आदेश काढून मराठा जातीसाठी एक समिती नेमली गेली आहे. ही शासकीय अधिकाऱ्यांची समिती मराठवाड्यातील मराठा समाजाचा अभ्यास करुन ते मागास आहेत की नाही यासंबंधीचा अहवाल देतील. फडणवीसांचा हा चिवडण्याचा धंदा शिंदेंचा आडोसा घेऊन चाललेला आहे. आता या शिंदे–समितीचे तेच होईल जे फडणवीसांच्या गायकवाड आयोगाचे झाले होते. गायकवाड आयोग हा ओबीसी आयोग म्हणून नियुक्त करण्यात आला होता. मात्र गायकवाड आयोगात बहुतेक सदस्य मराठाच होते.

खुद्द गायकवाड अध्यक्ष हेही कट्टर मराठा होते. त्यामुळे गायकवाड आयोगाने जातीसाठी माती खात खोटा अहवाल सादर केला व या खोट्या अहवालाच्या आधारे फडणवीसांनी मराठा आरक्षणाचा अध्यादेश काढला. सुप्रीम कोर्टाने गायकवाड आयोगाचा खोटारडेपणा उघड केला व गायकवाडांवर ताशेरे ओढले. हे ताशेरे इतके गंभीर आहेत की, गायकवाड हे न्यायधिश होण्याच्या लायकीचे नाहीत, एवढाच निष्कर्ष त्यातून निघतो. या निकालाने फडणवीसांची फटफजिती झाली. एवढी फटफजिती झाल्यावरही फडणवीसांची “तीच काडी आणी तोच गु” चिवडत बसण्याची सवय जात नाही.

शिंदेंच्या मराठा समितीचे तेच होणार आहे. मराठा मुख्यमंत्री व ब्राह्मण उपमुख्यमंत्री यांच्या दबावाखाली ही समिती काय अहवाल सादर करणार, हे सुज्ञास सांगण्याची गरज नाही. गायकवाड आयोगाप्रमाणे ही समिती आपल्या ऑफिसमध्ये बसूनच टेबल–सर्व्हे करेल, निवडक लोकांच्या मुलाखती घेतल्याचे नाटक करेल, खोटी आकडेवारी व खोटी माहिती गोळा केलेली दाखवली जाईल व या खोट्या माहीतीवरून मराठवाड्यातील मराठा हे मागास असून ते ओबीसी असल्याचा खोटा निष्कर्ष काढण्यात येईल व त्या आधारे मराठा समाजाल ओबीसी दर्जा देण्याची खोटी शिफारस अहवालात करण्यात येईल आणी हे सर्व खरेच आहे, असे गृहित धरून मराठवाड्यातील मराठा समाजाला ओबीसी आरक्षणात घुसविले जाईल. तीच काडी घेऊन आपलंच चिवडत बसण्याचा असा हा गंदा धंदा आहे.

हा गंदा धंदा येथेच थांबत नाही. मराठवाड्यातील मराठा ओबीसी झाला की, पश्चिम महाराष्ट्रातील मराठे लग्नासाठी मराठावाड्यात धाव घेतील. आधी हे मराठे विदर्भातील कुणब्यांशी विवाह संबंध जोडीत होते. अर्थात ९६ कुळी खानदानी(?) मराठ्यांसाठी शूद्र कुणब्यांच्या घरातील मुलीशी लग्न करणे म्हणजे फार मोठी नामुष्कीची गोष्ट ! नाकच कापून घेण्यासारखे असते. पण काय करणार, राजकारणाशिवाय मराठा जीवंत राहूच शकत नाही. राजकारण करायचे तर ओबीसी आरक्षणच हवे. राजकीय मृत्यु स्वीकारण्यापेक्षा शूद्र कुणब्यांची मुलगी स्वीकारणे केव्हाही रास्तच! पण आता ही नामुष्की टाळता येईल. विदर्भातील शूद्र कुणब्याच्या मुलीशी लग्न करण्यापेक्षा मराठवाड्यातील ९६ कुळी मराठा असलेल्या ओबीसी मुलीशी लग्न केले जाईल.

ओबीसी व्होटबँकेवर मराठा–ब्राह्मणांचे राजकीय पक्ष दरोडे टाकत असतात. आता ओबीसी आरक्षणावर दरोडा टाकून लुटमार करण्याचा प्रयत्न सुरुआहे. पण लक्षात ठेवा एकदाका ओबीसी ढाण्या वाघ जागा झाला, तर या दरोडेखोरांना पळताभुई थोडी होईल! तामिळनाडूतील स्टॅलिन पॅटर्न व बिहारातील कर्पुरी ठाकूर पॅटर्न लवकरच महाराष्ट्रात साकर होत आहेत.

**- प्रा. श्रावण देवरे**
संपर्क मोबाईल
– ९४ २२७ ८८ ५४६. ईमेल–
s.deore2012@gmail.com

### प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या लाभार्थ्यांनी ई–केवायसी व बँक खाते आधार संलग्न करावे

**गोंदिया,** :– प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा माहे मे–२०२३ मध्ये वितरीत होणाऱ्या हप्त्याच्या लाभासाठी केंद्र शासनाने काही अटी बंधनकारक केल्या आहेत, त्या अटींची पुर्तता करण्याचे आवाहन उपविभागीय कृषि अधिकारी मंगेश वावधने यांनी लाभधारक शेतकरी बंधूंना केले आहे.

पी.एम.किसान ई–केवायसी प्रमाणिकरण करणे हे संबंधित लाभार्थीने करावयाचे आहे. याकरीता सामाईक सुविधा केंद्रामार्फत (लील) किंवा केंद्र शासनाच्या पी.एम.किसान अपद्वारे अथवा पी.एम.किसान पोर्टलवरील फार्मर कॉर्नर मधील ई–केवायसी ओटीपी आधारीत सुविधेद्वारे प्रमाणिकरण करुन घ्यावे. तसेच बँक खाती आधार संलग्न करण्याकरीता संबंधित बँकेत जाऊन बँक खात्यास आधार संलग्न करुन घ्यावे किंवा पोष्ट मास्तर यांचेमार्फत इंडिया पोष्ट पेमेंट बँकेत खाते उघडावे. लाभार्थ्यांना काही तांत्रिक अडचणी येत असल्यास संबंधित गावचे कृषि सहाय्यक किंवा तालुका कृषि अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा. असे उपविभागीय कृषि अधिकारी,गोंदिया यांनी कळविले आहे.

# चला समजून घेऊया सर्वकष ग्रामविकास आराखडा



कोणत्याही गावाचा विकास साधायचा असेल तर त्यासाठी आधी ग्रामविकास आराखडा तयार करणं गरेजचं असतं. गावातील लोकप्रतिनिधी तसंच ग्रामस्थांनी मिळून ग्रामविकास आराखडा तयार केल्यास तो अधिक सर्वसमावेशक होतो. ग्रामविकास आराखडा तयार करण्यासाठी शासनाने काही निकषही घालून दिले आहेत. हे निकष कोणते आहेत आणि एकंदरीतच एखाद्या गावाचा विकास आराखडा कसा तयार करतात, या प्रक्रियेत कोणकोणते टप्पे असतात, हे जाणून घेवू या....

**ग्राममविकास आराखडा संकल्पना**

गावाचा विकास आराखडा तयार करताना तो शाश्वत ग्रामविकास आराखडा असणं गरेजचं आहे. भावी पिढ्यांच्या गरजा भागवता याव्यात यासाठी आताच्या आपल्या गरजा सीमित ठेवून विकास करणं, पर्यावरण लक्षात ठेवून विकास करणं याला शाश्वत विकास आराखडा असं म्हणतात.

**निधीचे स्रोत**

ग्रामविकास आराखडा तयार करण्यासाठी एकूण ७ प्रकारचे निधी ग्रामपंचायतीकडे उपलब्ध आहेत.

ग्रामपंचायतीचा स्वनिधी विकास आराखड्यासाठी वापरता येतो. यात मालमत्ता कर, पाणी कर यांचा समावेश होतो.

दुसरा स्रोत म्हणजे राज्य शासनाकडून प्राप्त होणारा महसुली हिस्सा. यात जमीन महसूल उपकर, मुद्रांक शुल्क अनुदान या राज्य शासनाच्या निधीचा समावेश होतो.

मनरेगा योजनेअंतर्गत जी विकासकामं गावात घेतली जातात, त्याच्यासाठी मिळणारा जो निधी आहे, तो तिसरा प्रकार आहे.

वित्त आयोगाचा निधी ग्रामविकास आराखडा तयार करण्यासाठीचा महत्त्वाचा निधी आहे. चालू स्थितीत पंधराव्या वित्त आयोगाचा विचार करता येईल.

स्वच्छ भारत अभियान आणि त्याअंतर्गत ग्रामपंचायत स्तरावर होणारी कामं, त्याला प्राप्त होणारा निधीही यामध्ये येतो.

ग्रामपंचायतीला मिळणारी बक्षीसं आणि त्यातून येणारा निधी ग्रामविकास आराखड्यात वापरता येतो.

लोकसहभागातून मिळणाऱ्या वर्गणीचाही वापर करता येतो.

या ७ प्रकारच्या निधींचा उपयोग करून ग्रामविकास आराखडा तयार करावा लागतो.

**वित्त आयोगाचा निधी**

वित्त आयोगाच्या निधीचं वितरण १०% जिल्हापरिषद, १०% पंचायत समिती, ८०% हा ग्रामपंचायतीला उपलब्ध होतो. २०१४ पासून पुढे अशाप्रकारे ग्रामविकास आराखडे तयार करण्यात यावेत, असे निर्देश शासनाने दिले आहेत. वित्त आयोगाचा जो निधी ग्रामपंचायतीला येतो त्याचे साधारणपणे २ प्रकार पडतात. बंधित आणि अबंधित निधी. यात ६०% बंधित, ४०% अबंधित अशाप्रकारे पहिलं विभाजन होतं. शासनाने दिलेला निधी वेगवेगळ्या घटकांसाठी वापरायचा असतो. ग्रामविकास आराखड्यात या निधीची उपलब्धता वेगवेगळ्या घटकांसाठी करुन द्यायची असते.

यात शिक्षण, आरोग्य आणि उपजीविका यासाठी २५%, महिलांच्या विकासासाठी १० % निधी, तर वंचित घटकासाठी त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात निधी द्यायचा असतो.

**ग्रामसभेचे महत्त्व**

ग्रामविकास आराखडा तयार करण्यासाठी गावपातळीवर संसाधन गट असला पाहिजे. यात गावातील शिक्षक, वकील, आरोग्याचे जाणकार, ज्येष्ठ नागरिक, अर्थशास्त्राचे प्राध्यापक, एनजीओचे प्रतिनिधी म्हणजे गावातील वेगवेगळ्या क्षेत्रातील जाणकारांना एकत्र करणं म्हणजे संसाधन गट होय. संसाधन गट आणि शासकीय कर्मचारी यांनी विचारमंथन करणं अपेक्षित असतं. ज्या ग्रामसभेमध्ये अंतिम ग्रामविकास आराखडा मंजूर केला जातो त्याच्याआधी वेगवेगळ्या ग्रामसभा घ्याव्यात, असं शासनानं नमूद केलंय.

महिलांची ग्रामसभा ज्यात महिलांच्या समस्या घेतल्या जातील. बाल ग्रामसभा घ्यावी. यात प्राथमिक, माध्यमिक असे १८ वर्षांच्या खालील विद्यार्थ्यांचे प्रश्न, समस्या समजतील. वंचित घटकांची ग्रामसभा घ्यावी. त्यांचे प्रश्न, समस्या, निधी कसा उपलब्ध करून द्यायचा, हे समजतं. वॉर्डनिहाय ग्रामसभा घ्यावी म्हणजे यातून वॉर्डनिहाय प्रश्न समजून घेता येतात.

**पारदर्शक आराखडा**

संसाधन गट तयार केल्यास वेगवेगळ्या लोकांपर्यंत ग्रामविकास आराखडा पोहोचतो. संसाधन गट लोकांना माहिती झाला पाहिजे. सदस्यांची माहिती नोटीस बोर्डावर ऑईल पेंटने लिहायची असते. तो नोटीस बोर्ड ग्रामपंचातीच्या भींतीवर दर्शनी भागावर लावावा, असे शासनाचे निर्देश आहेत. मंजूर ग्रामविकास आराखडा ग्रामपंचायतीनं ऑईल पेंटने रंगवून ग्रामपंचायतीच्या दर्शनी भागात लावावा, असे शासनाने निर्देश दिले आहेत. यामुळे गावातील लोकांना गावातील विकास कामांविषयी माहिती मिळते.

सामाजिक लेखापरीक्षण समिती गावात स्थापन करावी. यात गावातील सीए, तज्ज्ञ अशा लोकांची समिती करावी. गावात केलेलं काम योग्यप्रकारे केलं आहे की नाही, त्याचं मूल्यमापनं या समितीनं करायचं आहे. त्यांचा रिपोर्ट दर तीन महिन्याला ग्रामपंचायतीला सादर केला पाहिजे. विकास आराखड्यातील कामाची गुणवत्ता आणि प्रगती हे पाहण्यासाठी गावपातळीवर कार्यगट स्थापन करावा.

**वार्षिक, पंचवार्षिक आराखडा**

सरकाने २०१९ मध्ये सांगितलं होतं की, २०२०–२१ चा ग्रामविकास आराखडा तयार करावा आणि त्याचबरोबरीनं २०२०–२१ ते २०२४–२५ हा पंचवार्षिक विकास आराखडासुद्धा तयार करावा. म्हणजे आज १४ व्या वित्त आयोगाच्या कालावधीमध्ये प्रत्येक ग्रामपंचायतीचा पाच वर्षांचा विकास आराखडा तयार आहे. आता या प्रत्येक ग्रामपंचातीचं काम काय आहे, की वार्षिक विकास आराखडा तयार करताना त्यांनी पंचवार्षिक विकास आराखडा तयार करताना त्यामध्ये काय प्रयोजन केलेलं आहे, मिळणारा निधी किती आहे, कामाची निकड किती आहे, ते पडताळून बघायचं आहे. त्यानुसार त्या वर्षीच्या विकास आराखड्यात बदल करायचे आहेत.

**असलेली आव्हानं**

गावात तज्ज्ञ व्यक्तीची उपलब्धता, लोकसहभाग ग्रामसभेला उपस्थिती, सरपंचांसह सदस्यांना अनेक गोष्टी माहितीसाठी संपूर्णपणे ग्रामसेवकावर अवलंबून रहाणं आणि प्रशिक्षण ही काही ग्राम विकासातील आव्हानं आहेत. या आव्हानांवर महाराष्ट्र शासनाची प्रशिक्षण संस्था “यशदा’ ही स्थानिक स्वराज्य संस्थांमधील लोकप्रतिनिधींना प्रशिक्षणांचे आयोजन करुन मात करण्याचा प्रयत्न करत असते.

**रणजितसिंह राजपूत, जिल्हा माहिती अधिकारी, नंदुरबार**

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,चंचलबेन स्कूल रोड, गजानन कॉलनी गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ९४२३११२४३१ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# नेतेमंडळी आली अन् पाठ थोपटून गेली

**गोंदिया:** देवरी शहरातील दक्षिण वनविभाग कार्यालयाबाहेर ग्रामसभेच्या १७ सदस्यांनी गेल्या ३० मे पासून आमरण उपोषण सुरु केले होते. मात्र ६ जून रोजी सायंकाळी माजी पालकमंत्री परिणाम फुके यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकाऱ्यांनी फक्त तोंडी आश्वासन दिले. सदर घटना नाट्यमयरित्या संपुष्टात आले. परंतु विश्लेषणात पाहिल्यास कडक उन्हात ८ दिवस उपोषणाला बसलेल्या ग्रामसभेच्या गटाच्या पदाधिकाऱ्यांना काहीही निष्पन्न झाले नाही. जिल्हाधिकारी किंवा डीएफओ यांच्याकडून कोणताही निर्णय घेण्यात आला नाही. त्यांच्या मागण्या मान्य करण्यात आले नाही. असे असतानाही राजकीय पक्षाने उपोषण मागे घेत उपोषणकर्त्यांच्या विजयाचा दावा केल्याने वातावरण तापले आहे.



वनविभागावर असहकार, ग्रामसभेच्या घटनात्मक अधिकारांची पायमल्ली अणि त्यांच्या कामात विनाकारण हस्तक्षेप केल्याचा आरोप ग्रामसभेच्या गटाने सुमारे दशरभरापासून केला होता. मात्र हे प्रकरण तापले तेव्हा १७ मे रोजी म्हैसुली ग्रामसभेत वनविभागाने गोळा केलेला तेंदुपत्ता कोटजांभोराच्या वनविभागाच्या ब्लॉकने येथे जप्त केला. यानंतर ग्रामसभेच्या गटाने वनविभागाच्या कर्मचाऱ्यांवर बेकायदेशीरपणे तेंदूपत्ता जप्त केल्याप्रकरणी ॲट्रॉसिटी व इतर कायद्यान्वये फौजदारी गुन्हा नोंदविण्याची मागणी पोलीस अधीक्षकांकडे केली. प्रलंबित मागण्यांसाठी वनविभाग कार्यालयासमोर आमरण उपोषणाची घोषणा केली. ठरल्यानुसार ३० मे रोजी १७ ग्रामसभांच्या पदाधिकाऱ्यांनी वनविभाग कार्यालयासमोर आमरण उपषण सुरु केले. वनविभागाची भूमिका नकारात्मक व उदासीन असल्याने आंदोलकांनी आ.सहषराम कोरोटे यांना याप्रकरणी हस्तक्षेप करण्याची विनंती केली. यासंदर्भात आमदारांनी वनविभागाचे उच्च अधिकारी व जिल्हाधिकारी यांच्याशी फोनवर चर्चा केली व त्यांचे टाळाटाळ धोरण आणि उपोषणकर्त्यांची बिघडलेली स्थिती पाहता सोमवार (दि.५) रोजी दुपारी स्वत: आ.सहषराम कोरोटे यांच्यासह हजारांहून अधिक वनवासी देवरीच्या दक्षिण वनविभाग कार्यालयाच्या दारात धरण्यावर बसले. आमदार सहषराम कोरोटे यांच्या नेतृत्वाखाली हजारो वनवासींनी आपल्या ६ प्रमुख मागण्या पूर्ण होईपर्यंत धरणे आंदोलन सुरुच ठेवण्याची घोषणा केली.

सोमवारी रात्रभर हजारो लोकांसह आमदारही वनविभागाच्या कार्यालयासमोर रात्रभर तिथेच राहिले. काँग्रसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, जिल्हाध्यक्ष दिलीप बन्सोड यांनी मंगळवारी सकाळी आंदोलनस्थळी पोहोचून तेथे उपस्थित हजारो लोकांची भेट घेतली व उपोषणाला बसलेल्या ग्रामसभेच्या पदाधिकाऱ्यांची भेट घेऊन प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन डी.एफ.ओ. कुलतारसिंह भाटीया यांच्याशी दुरध्वनीवरुन चर्चा केली. या प्रकरणावर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली.

## राजकीय खेळीचा बनला आखाडा

**ग्रामसभा विरुद्ध वनविभाग असा हा वाद मंगळवारी सकाळपर्यंत राजकीय खेळीचा आखाडा बनला. ३० मे पासून उपोषणाला बसलेल्या ग्रामसभेच्या पदाधिकाऱ्यांच्या सोबत माजी आ.संजय पुराम यांच्यासोबत भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते बसले. काही वेळाने माजी पालकमंत्री परिणय फुके हेही तिथे पोहोचले. त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांशी फोनवर चर्चा केल्यानंतर ते येथे पोहोचणार असल्याचे मंचावरुन जाहीर केले. डॉ. परिणय फुके यांच्यासोबत ग्रामसभा आणि वनविभाग यांच्यात समन्वयकाची भूमिका बजावणारे विदर्भ निसर्ग संरक्षण दिलीप गोंडेही पोहोचले होते. सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास वनविभाग कार्यालयाच्या समोर धरण्यावर बसलेले आदिवासी लोक व आ. कोरोटे हे बैठकीत न पोहोचता जिल्हाधिकारी यांच्यासह सुमारे ११ जण माजी पालकमंत्री डॉ. फुके व माजी आ. पुराम व २-३ उपोषणकर्ते तहसील कार्यालयात बैठकीला बसले. या दरम्यान तहसील कार्यालयात आमदारांसह अनेक ग्रामसभेचे पदाधिकारी तेथे पोहोण्यापुर्वीच उपोषण संपल्याचे जाहीर करण्यात आले.**

## मागण्या तशाच, आंदोलकांच्या घोषणा

**ग्रामसभेच्या गटाच्या ६ प्रमुख मागण्यांपैकी एकाही मागण्यावर कोणताही ठोस निर्णय घेण्यात आला नाही. गोळा केलेल्या तेंदुपत्यांच्या वाहतुकीबाबत वनविभागाकडून कोणतीही कारवाई केली जाणार नाही. असे केवळ तोंडी आश्वासन या बैठकीत देण्यात आले. हा प्रकार वनविभाग कार्यलयासमोर धरणे धरुन बसलेल्या हजारो लोकांना समजताच ते संतप्प झाले आणि प्रशासन सत्ताधारी पक्षाच्या दबावाखाली काम करत असल्याचा आरोप करीत घोषणाबाजी करु लागले. प्रसंगावधान पाहून आ.सहषराम कोरोटे यांनी संतप्त झालेल्या जनतेला शांत केले व यापुढील काळात ग्रामसभेच्या बाजूने उभे राहण्यचे आश्वासन दिले. एकंदरीत ग्रामसभा विरुद्ध वनविभाग यांच्यातील हा हक्काचा लढा हा राजकीय सट्टेबाजीचा आखाडा बनला आहे. ज्यात उघडपणे जबरदस्ती`कली गेली. यात ग्रामसभेला काहीही साध्य झाले नाही.**

# जेवढा मोठा संघर्ष तेवढे मोठे यश-नागरे पाटील



**अर्जूनी मोरगाव:** - जेवढा मोठा संघर्ष तेवढे यशही मोठे असते. आयुष्यात कष्टामुळे परिवर्तन होईल. उज्वल भविष्यासाठी ऐन तारण्यात ध्येय निश्चित करून त्या दिशेने अथक परिश्रमाने वाटचाल केल्यास यश निश्चित आहे. अपयशाने खचून न जाता प्रयत्नरत राहा, आणि यशस्वी जीवनाच्या लाटेवर स्वार व्हा, असे प्रतिपादन लाचलुचपत प्रतिबंध विभागाचे अतिरिक्त पोलिस महासंचालक विश्वास नांगरे-पाटील यांनी व्यक्त केले.

राजकुमार बडोले तथा युथ प्रतिष्ठानतर्फे सरस्वती विद्यालय येथे (ता.०५) रोजी आयोजिलेल्या प्रेरणात्मक व्याख्यान कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाचे संयोजक राजकुमार बडोले यांनी श्री. नांगरे-पाटील यांचे स्वागत केले. बडोले यांनी यांनी प्रास्ताविकात सामाजिक न्याय मंत्री असतांना युवकांसाठी केलेल्या कार्याची माहिती दिली.

श्री. नांगरे-पाटील म्हणाले, की छत्रपती शिवरायांनी बालवयात हिंदवी स्वराज्य स्थापनेचा संकल्प केला अन मोठ्या प्रयत्नांनी तो यशस्वी केला. अभ्यासपूर्ण नियोजन अन त्यादृष्टीने टाकलेल्या पावलांमुळे महाराज यशस्वी झाले. त्याचबरोबर प्रजेबद्दलचे प्रेम , त्यांना केलेली मदत अन त्यांची केलेली सेवा, हीच महाराजांच्या यशाची अन पराक्रमाची शिदोरी असल्याचे सांगितले.

## विद्यार्थ्यांना दिला मोलाचा सल्ला

**प्रेरणात्मक व्याख्यान दरम्यान विश्वास नागरे पाटलांनी जमलेल्या युवकांना यशवंत होण्याचा सक्सेस पासवर्ड सांगितला यशस्वी व्हायचं असेल स्वतःला सिद्ध करण्यासाठी मनातून नकारात्मक गोष्टी बाहेर काढाव्या ० तास टाईमपाससाठी असावेत, इंटरनेट मोबाईलसाठी झिरो तास ठेवा अभ्यासासोबतच दररोज एक तास व्यायाम करा आणि कामासाठी किमान आठ तास द्या मग ते काम असो वा अभ्यास दररोज नऊ मिनिटे मेडिटेशन करा जेणेकरून लक्ष केंद्रित व्हायला अधिक मदत होईल स्वतःला शिस्त लावून घ्या भरपूर मेहनत करा हे मोलाचे सल्ले आत्मसात केल्यास यशाचे शिखर नक्की दूर नसेल असेही त्यांनी यावेळी सांगितले. व्यवसाय असो नौकरी असो अथवा ईतर काही मेहनत मेहनत आणि मेहनत करूनच यश मिळतो बुवाकडे जाऊन आपला मंगल बघण्यापेक्षा आपल मनगट मजबूत करा अपयशाने हुरळून जायचं नाही जो पर्यत यशस्वी होत नाही तो पर्यत मैदान सोडायचं नाही. आणि मि हेच केल मिळालेल्या यशाने माझे मित्र मला म्हणायचे आता तुला माधुरी दिक्षित पन नाकारणार नाही. त्यामुळे आधी करिअर घडवा असे आवाहन विश्वास नागरे पाटलांनी जमलेल्या तरुणांना २ माईकचा ताबा घेत, आपल्या आयुष्याचा प्रवास सांगितला हे सांगताना पदोपदी सुविचारांची, शेरोशायरीची पखरण केली यावेळी अर्जुनीकरांनी दिलेला प्रतिसाद अप्रतिम होता.**

## गुणवंतांचा सत्कार

**तालुक्यातील सुरबन /बोंडगाव येथील रहिवासी असेलेला अमित उंदिरवाडे याने नुकत्याच झालेल्या यूपीएससी परीक्षेत ५८१ रैंक मिळवली सोबतच हेमंत सुटे यांनी मोठ्या प्रमाणात एअर होस्टेसणा प्रशिक्षित करून योगदान दिल यावेळी दहावीच्या परीक्षेत जिल्ह्यातून प्रथम आलेल्या काजळ रुखमोडे, ईतर गुणवंत धीरज भिवघडे, पर्व रामटेके मीनाक्षी कोसरकर इशिता उंदिरवाडे हिमांशी करंजेकर प्रेरणा हसीजा हितेश्वरी शहारे आचल गुप्ता यशपाल गोंडाणे यांचा सत्कार करण्यात आला.**

## 'त्या" दिव्यांगाच्या प्रेमाने भारावले नागरे पाटील

**विश्वास नागरे पाटील यांचा चाहता वर्ग महाष्ट्रातच नाही तर अवघ्या देशात आहे. आपला हिरो आपल्या परिसरात आल्याची बातमी काळातच त्याच्यासाठी काही द्यायचं म्हणून अनेकांनी गिफ्ट दिल त्यात अशाच एका चाहत्याने स्वःता बनवलेली पेंटिंग गिफ्ट केली.त्यांचा तो चाहता अंपग होता त्याने दिलेलं गिफ्ट हे बघून नागरे पाटील अधिकच भारावले होते. हा प्रसंग बघून उपस्थितांनी टाळ्यांचा गडगडाटासह प्रतिसाद दिला.**

# नवीन व्यापारी संकुल योजनेतील लोकवर्गणीचा फेरविचार करा-सुनील मिश्रा



**देवरी:** देवरी येथील नगरपंचायतीच्या वतीने पंडित दिनदयाल उपाध्याय व्यापारी संकुल योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत लोकवर्गणीतून निधी जमा करून देवरी येथे व्यापारी संकुल बांधण्यात येणार आहे. या व्यापारी संकुलनातील खाली असलेल्या गाळ्याची किंमत ९ लाख आणि पहिल्या मजल्यावरील गाळ्याची किंमत ६ लाख रूपये एवढी ठेवण्यात आली आहे. ही एवढी मोठी रक्कम फूटपाथवर टपरी टाकून उपजीवीका चालवणारे लोक भरू शकत नाही . तरी या विषयावर गांभीर्याने पुन्हा विचार करावे, अशा आशयाचे निवेदन गुरुवार (दि. ८ जून ) रोजी शिव-सेना (उध्दव ठाकरे) पक्ष देवरी तालुका प्रमुख सुनील मिश्रा यांच्या नेतृत्वात देवरी नगरपंचायतीचे मुख्याधिकारी प्रणय तांबे यांना सादर करण्यात आले.

या निवेदनात, नगरपंचायतच्या वतीने देवरी शहरात विविध ठिकाणी व्यापारी संकुल बांधण्यात येत आहे. येथील खालच्या गाळ्याची किंमत ९ लाख आणि पहिल्या मजल्यावरील गाळ्याची किंमत ६ लाख रूपये ऐवढी ठेवण्यात आली आहे. ऐवढी मोठी रक्कम फुटपातवर टपरी टाकून आपल्या कुंटूबाची उपजीवीका चालविणा-या लोकांसाठी फार मोठी आहे. हे टपरीवाले लोक मोठे व्यापारी नसून सामान्य गरजू लोक आहेत. हे दररोज १५०-२०० रुपये कमवितात. ऐवढी मोठी रक्कम देणार तरी कुठून.ही रक्कम एकमुस्त देणे शक्य नाही.

तसेच देवरी येथील लहान लहान टपरी वाले लोक मागील २०-२५ वर्षापासून आपली उपजीवीका याच टपरीवरून चालवीत आहेत. त्यांना या व्यापारी संकुलनात पहिले प्राधान्य देण्यात यावे. आणि व्यापारी संकुल बांधण्याकरीता जितकी रक्कम लागत असेल(अंदाजे ५० हजार ते १ लाख रुपये) तितकीच रक्कम त्यांच्याकडून घेण्यात यावे. त्याचप्रमाणे या व्यापारी संकुलनात गाळे बांधकामाला लागणारी रक्कम ही एकमुस्त न घेता त्याला ही रक्कम किस्ती प्रमाणे देण्याची सवलत देण्यात यावे असे म्हटले आहे.

तरी या व्यापारी संकुल योजनेती गाळा बांधकाम विषयीचे प्रश्न गांभीर्याने घेवून फेरविचार करून फुटपात वरील टपरीवाल्यांना न्याय मिळवून द्याल अशी मागणी या निवेदनातून केली आहे.

निवेदन सादर करणा-या शिष्टमंडळात शिवसेना (उध्दव ठाकरे) पक्षाचे देवरी तालुका प्रमुख सुनील मिश्रा, देवरी शहर प्रमुख राजा भाटिया, वार्ड प्रमुख छन्नुलाल नेवारगडे, उपतालुका प्रमुख दयाल पवार, राजेश पटले, प्रकाश बिंझाडे, अरमान अली, संजय लांडेकर, जितू शेंडे, आदित्य टेकाम, अनील सोनसर्वे व शाहील शेख यांचा समावेश होता.

# ओबीसीवरील अन्याय व महापुरुषांचा अपमान त्वरित थांबवा-ओबीसी जनमोर्च्याचे निवेदन

**यवतमाळ:** - राज्य सरकारने मराठवाड्यामधील मराठा बांधवांना ओबीसीमध्ये आणण्याचा घाट घातला असून समिती सुद्धा बनवली आहे. त्यामुळे ओबीसीवर हा सर्वात मोठा अन्याय होणार असल्याने ओबीसी जनमोर्चा सरकारच्या या भूमिकेचा निषेध नोंदवत आहे. सोबतच ओबीसी महापुरुषांची लेखणीतून करण्यात येणारे अपमान त्वरीत थांबविण्यासंदर्भातील मागणीचे निवेदन यवतमाळ भारतीय पिछडा (ओबीसी) शोषित संघटना व ओबीसी जनमोर्चा महिला आघाडीच्यावतीने देण्यात आले.



निवेदनात राज्य सरकारच्या वतीने परदेशी शिष्यवृत्ती करीता जी नियमावली बनवली त्यात ओपन प्रवर्ग असलेल्या विद्यार्थ्यांकरीता मर्यादा ही वीस लाख ठेवल्या गेली, आणि ओबीसी मागासवगीय विद्यार्थ्यांसाठी आठ लाख रुपये क्रीमिलरची मर्यादा ठेवले आहे, हे ओबीसीवर अन्याय आहे. महाराष्ट्र भवन या ठिकाणी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि अहिल्यादेवी होळकर यांचा पुतळा हटवला गेला, महाराष्ट्राचे दैवत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांची राजमुद्रा ही सुद्धा झाकल्या गेली, हे कृत्य करणाऱ्यावर कारवाई करण्यात यावी. तसेच सावित्रीबाई फुलेच्या संदर्भामध्ये ज्या वेबसाईटने आक्षेपार्य चुकीचे लिखाण केलेले आहे या उपटसभू संपादकावर त्वरित कारवाई करावी, व त्यांच्यावर बंदी आणावी या मागणीचा उल्लेख होता.

निवेदन देतेवेळी शहराध्यक्ष कमल खंडारे, डॉ. संजय ढाकुलकर तालुका अध्यक्ष सविता हजारे प्रदेश कार्यकारणी सदस्य, सुनिता काळे विदर्भ अध्यक्ष, मायाताई गोरे महिला अध्यक्ष माधुरी फेडर, सहसचिव. नीताताई दरणे उपाध्यक्ष, अनिता गोरे सहअध्यक्ष, कल्याणी मादेशवार संघटक, वैशाली फुसे संघटक, सुनिता अनिल काळे सदस्य, शोभना कोटबे मार्गदर्शक भीमराव ढेगळे मार्गदर्शक, शशिकांत लोळगे कर्मचारी नेते, डॉ. ज्ञानेश्वर गोरे प्रदेशाध्यक्ष, विलास काळे केंद्रीय कार्यकारणी सदस्य उपस्थित होते.

# उपसभापतींनी केले यार्डचे निरीक्षण



**गोरेगाव:** तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती तेजेंद्र हरिणखेडे यांनी समिती परिसरातील यार्डचे निरीक्षण करुन पाहणी केली. दरम्यान समस्या निदर्शनास आल्यावर त्या मार्गी लावण्याच्या सुचना संबंधितांना दिले. यार्ड परिसरात असलेल्या विहिरीत मोठ्या प्रमाणात केरकचरा साचला असून अस्वच्छता निर्माण झाली आहे. यामुळे स्वच्छता कर्मचाऱ्यांना कामी लावून त्यांना विहिरीची स्वच्छता करण्याच्या सुचना दिल्या.

कृषी उत्पन्न बाजार समितीची निवडणूक पार पडली असून नवीन सभापती, उपसभापती व संचालक मंडळाने पदभार स्विकारला आहे. समितीचे उपसभापती तेजेंद्र हरिणखेडे यांनी कृउबास परिसातील यार्डची पाहणी केली. या दरम्यान त्यांनी समितीच्या यार्डमध्ये मोठी विहिर आहे. विहिरीच्या आत झाडेझुडपे व वडाचे झाडे लागले आहेत. तर विहिरीच्या आजूबाजूला घाण पसरलेली आहे. यामुळे विहिरीच्या सभोवताली केरकचरा पसरला आहे. परिणामी उपसभापती तेजेंद्र हरिणखेडे यांनी इतर कर्मचाऱ्यांना विहिरीची स्वच्छता करण्याकरिता आलेल्या कामगारांना स्वच्छता करण्याचे आदेश दिले. जेणेकरुन बाजार समितीच्या यार्डमध्ये जनावरासाठी स्वच्छ पाणी व इतर कामाकरिता पणीची समस्या दूर होईल. यामुळे यार्डातील विहिरीची स्वच्छतेला प्रश्न मार्गी लागला असून पाण्याची सोय झाली आहे.

**सोयीसुविधा उपलब्ध करुन देणार**

कृषी उत्पन्न बाजार समिती, गोरेगाव येथे साप्ताहिक बाजार भरत असतो. दरम्यान, नवीन आलेल्या संचालक मंडयाने बाजाराचे निरीक्षण करुन असलेल्या असुविधा जाणून घेतल्या. तसेच शेतकऱ्यांच्या गुरांसाठी पिण्याचे पाणी डोंगी (समितीचे यार्डमध्ये वेगवेगळ्या ठिकाणी डोंगी) बाजारामध्ये होणारे शेणखत उचलण्याकरिता मजूर, शेतकऱ्यांसाठी पिण्याच्या पाण्याची सोय करुन देण्यात आली. असुविधा दूर करुन सोयीसुविधा उपलब्ध करुन देणार, असे समितीचे सभापती गिरधारी बघेले, उपसभापती तेजेंद्र हरिणखेडे यांनी सांगितले.

# विदर्भ तेली समाज महासंघाची संवाद यात्रा-समाजाने हक्कासाठी संघटित व्हावे

**गोंदिया :-** भारतात दिवसेंदिवस बदलत चाललेल्या राजकीय सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीचा विपरीत परिणाम भारतातील प्रत्येक नागरीकावर होत असल्याचे चित्र दिसून येत आहे.भारत लोकसंख्येच्या दृष्टीने जगात प्रथम क्रमांकाचा देश असून भारतात अनेक तरुण पिढी बेरोजगारीच्या खाईत लोटत आहे. दारिर्द्य, बेरोजगारी, अंधश्रद्धा, धर्मवाद, भाषावाद, जातीयवाद, प्रांतवाद सरकारी विभागाचे खाजगीकरण, शेतकऱ्याच्या शेतमालाला योग्य भाव न मिळणे यासारख्या समस्या निर्माण झाली आहे.



सध्या बदलत्या भारताच्या आणि महाराष्ट्राचे एकूण परिस्थिती बघितलं असता वेगळ्या पध्दतीने राजकारण सुरू आहे . असे जाणवते. मोठ्या संख्यने असणाऱ्या ओबीसी समाजावर त्यांच्या परिणाम होत आहे, त्याबद्दल समाजात जनजागृती करण्यासाठी व संविधानिक हक्क लढ्यासाठी काढण्यात आलेल्या विदर्भ तेली समाज महासंघाच्या संवाद यात्रेचे गोंदियात मंगळवारला आगमन झाले होते.

या यात्रेतील मान्यवरांनी समाजाल संविधानिक हक्क अधिकाराची माहिती देत लढ्यातील मंडल यात्रेत व समारोपीय कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन केले. यावेळी वेगळा विदर्भ राज्य, ओबीसींची जातनिहाय जनगणना, मंडल आयोगाच्या शिपारशींची अमलबजावणी करणे, स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशी लागू करणे आदीसह ओबीसींच्या महाज्योती संस्थेची माहिती देण्यात आली.

या संवाद यात्रेत नेतृत्व विदर्भ तेली समाज महासंघाचे अध्यक्ष रघुनाथ शेन्डे, सरचिटणीस डॉ.प्रा नामदेव हटवार,संघटक प्रा.रमेश पिसे, विलास काळे, उमेश कोरराम, युवा आघाडी अध्यक्ष शेषराव गिरपुंजे, सहसंघटक कृष्णा बेले, सहसचिव संजय सोनटक्के, सुधीर सुर्वे, मीरा मदनकर, संजय भलमे, पुरुषोत्तम कामडी, राजेंद्र डकरे, सुधाकर मेश्राम, अनिल कुमार, नागेश्वर हटवार, शंकर ढबाले, प्रकाश भुरे, रविंद्र मनापुरे, आनंदराव कृपाने, नारायण बावनकर, राजेश चांदेवार, अँड पुष्पकुमार गंगबोईर आदी करीत आहेत.

गोंदियातील संताजी मंगल कार्यालयात झालेल्या संवाद यात्रा मार्गदर्शन कार्यक्रमाला कैलास भेलावे, शेषराव गिर्हेपुंजे, संजय सोनटक्के, सुचिता बडवाईक, रविता वैद्य, सुनंदा बावनकर, मिनाक्षी बावनकर, कल्पना धुर्वे, नंदा डोरले, इंदुताई राजुरकर, क्रिष्णा चव्हाण, मिना सुर्यवंशी, भाष्कर राजगिरे, रामभाऊ वंजारी, ममता गिर्हेपुंजे, शंकर चामट, विजय मानापूरे, अतुल वैद्य, शिवशकंर बावनकर, संजय बावनकर, राजेश चांदेवार, बबलू गभणे, नविन बावनकर, गंगाराम कापसे, प्रमोद खोब्रागडे, विकास कारंजेकर, नम्रता बल्ले, दिनेश बल्ले, महेश कावळे, राजेश वैद्य, गणेश बरडे, शेषराव गिर्हेपुंजे, पुरुषोत्तम गिर्हेपुंजे, हर्षा न्यायकरे आदी मोठ्या संख्येने समाजबंधुभगिणी उपस्थित होत्या.


# कार्यालय ग्राम पंचायत सोनबिहरी
## पं.स.गोंदिया जि.प.गोंदिया

जा.क्र. १२३/२०२३ दि.०८/०६/२०२३

## निविदा

ग्राम पंचायत सोनबिहरी अंतर्गत १५ वित्त आयोग फंड २०२०-२०२१ ते २०२३-२०२४ व इतर निधी सण २०२३-२४ वर्षा करीता पाणी पुरवठा योजनेचे साहित्य हातपंपास लागणारे सहित्य स्ट्रीट लाईड दिवाबत्ती करीता लागणारे साहित्य तसेच विद्युत फिटींगकरिता लागणारे सहित्य संगणक करीता लागणारे साहित्य कार्यालयीन लागणारे फर्निर्चर साहित्य पुरविण्याकरिता निविदा (दरपत्रक) पंजीकृत पुरवठाधारकाकडून मागविण्यात येत आहेत.

तरी इच्छुक पुरवठाधारकांची दि.१४/०६/२०२३ दुपारी ३.०० वाजेपर्यंत बंद लिफाफ्यामध्ये दरपत्रक सादर करावे. प्राप्त दरपत्रक शक्य झाल्यास दि.२०/०६/२०२३ ला दुपारी १.०० वाजता उघडण्यात येईल.

**साहित्याचे विवरण.**

१) हातपंपास लागणारे सहित्य पाईप १ इंच/रॉड/चैन बेअरीग/सिलेंडर/वायरस/साकेट/एक्सल पीन/ अप्पर वाल/लोवर वाल/नटबोल्ट व ईतर हातपंपास लागणारे साहित्य. २) पाणी पुरवठा योजनेस लागणारे साहित्य/पीव्हीसी पाईप अर्धा इंच/१ इंच/२ इंच.३ इंच एचडीपीई पाईप/ पीव्हीसी साकेट/पीव्हीसी केपलर/७५ एमएम/११० एमएम/पीव्हीसी टी.पीव्हीसी वॉल/ पीव्हीसी.निप्पल/पीव्हीसी/युनियन/पीव्हीसी एच ६० नल व इतर आवश्यक साहित्य. ३) दिवाबत्ती साहित्य स्ट्रीट लाईट करीता लागणारे साहित्य-एलईडी बल्ब १५ वाट/२० वाट/२३ वाट/ २५ वाट/३० वाट/होल्डर वायर कॉपर/एल्युमिनीयम/ग्रीप एलसीबी व ईतर आवश्यक साहित्य. ४) विद्युत फिटींग करीता लागणारे सर्व प्रकारचे आवश्यक साहित्य. ५) संगणकाला लागणारे सर्व प्रकारचे साहित्य-कम्प्युटर कंपलिट सेट/लॅपटॉप/प्रिंटर ऑल ईन वन व ईतर सर्व प्रकारचे आवश्यक साहित्य. ६) कार्यालय लागणारे सर्व प्रकारचे आवश्यक सहित्य-लोखंडी आलमारी टेबल व्हीलचेयर व इतर सर्व प्रकारचे आवश्यक साहित्य. ७) अपंग/विधवा महिलांना करीता लागणारे सर्वप्रकारचे आवश्यक साहित्य-मच्छरदानी व इतर सर्वप्रकारची आवश्यक साहित्य. ८) सार्वजनिक स्थळी करीता सर्व प्रकारचे लागणारे साहित्य-थ्रीरीसीटर लोखंडी बेंच व इतर सर्व प्रकारचे साहित्य. ९) अंगणवाडी करीता लागणारे सर्व प्रकारचे साहित्य-खेडणी साहित्य व सर्व प्रकारचे साहित्य. १०) उपकेंद्र करीता लागणारे साहित्य-बेड कार्यालयीन सर्वप्रकारचे आवश्यक साहित्य. ११) पाणी शुद्धी करण करण्याकरिता ब्लिचींग पावडर व इतर.

**अटी व शर्ती**

१) दर पत्रक मंजुर झाल्यास १०० स्टेंम्प पेपर पर करारनामा करुन धावे लागेल.

२) कोणतेही कारण न दर्शविता दरपत्रक मंजूर किंवा नामंजूर करण्यास अधिकार सरपंच/ग्रामसेवक बलमाटोला राखून ठेवण्यात आले आहे.

**सरपंच** ग्राम पंचायत, सोनबिहरी — **ग्रामसेवक** ग्राम पंचायत, सोनबिहरी



# कार्यालय ग्राम पंचायत बलमाटोला
## पं.स.गोंदिया जि.प.गोंदिया

जा.क्र. ६६/२०२३ दि.०९/०६/२०२३

## निविदा

ग्राम पंचायत बलमाटोला अंतर्गत १५ वित्त आयोग फंड २०२०-२०२१ ते २०२३-२०२४ व इतर निधी सण २०२३-२४ वर्षा करीता पाणी पुरवठा योजनेचे साहित्य हातपंपास लागणारे सहित्य स्ट्रीट लाईड दिवाबत्ती करीता लागणारे साहित्य तसेच विद्युत फिटींगकरिता लागणारे सहित्य संगणक करीता लागणारे साहित्य कार्यालयीन लागणारे फर्निर्चर साहित्य पुरविण्याकरिता निविदा (दरपत्रक) पंजीकृत पुरवठाधारकाकडून मागविण्यात येत आहेत.

तरी इच्छुक पुरवठाधारकांची दि.१४/०६/२०२३ दुपारी ३.०० वाजेपर्यंत बंद लिफाफ्यामध्ये दरपत्रक सादर करावे. प्राप्त दरपत्रक शक्य झाल्यास दि.२०/०६/२०२३ ला दुपारी १.०० वाजता उघडण्यात येईल.

**साहित्याचे विवरण.**

१) हातपंपास लागणारे सहित्य पाईप १ इंच/रॉड/चैन बेअरीग/सिलेंडर/वायरस/साकेट/एक्सल पीन/ अप्पर वाल/लोवर वाल/नटबोल्ट व ईतर हातपंपास लागणारे साहित्य. २) पाणी पुरवठा योजनेस लागणारे साहित्य/पीव्हीसी पाईप अर्धा इंच/१ इंच/२ इंच.३ इंच एचडीपीई पाईप/ पीव्हीसी साकेट/पीव्हीसी केपलर/७५ एमएम/११० एमएम/पीव्हीसी टी.पीव्हीसी वॉल/ पीव्हीसी.निप्पल/पीव्हीसी/युनियन/पीव्हीसी एच ६० नल व इतर आवश्यक साहित्य. ३) दिवाबत्ती साहित्य स्ट्रीट लाईट करीता लागणारे साहित्य-एलईडी बल्ब १५ वाट/२० वाट/२३ वाट/ २५ वाट/३० वाट/होल्डर वायर कॉपर/एल्युमिनीयम/ग्रीप एलसीबी व ईतर आवश्यक साहित्य. ४) विद्युत फिटींग करीता लागणारे सर्व प्रकारचे आवश्यक साहित्य. ५) संगणकाला लागणारे सर्व प्रकारचे साहित्य-कम्प्युटर कंपलिट सेट/लॅपटॉप/प्रिंटर ऑल ईन वन व ईतर सर्व प्रकारचे आवश्यक साहित्य. ६) कार्यालय लागणारे सर्व प्रकारचे आवश्यक सहित्य-लोखंडी आलमारी टेबल व्हीलचेयर व इतर सर्व प्रकारचे आवश्यक साहित्य. ७) अपंग/विधवा महिलांना करीता लागणारे सर्वप्रकारचे आवश्यक साहित्य-मच्छरदानी व इतर सर्वप्रकारची आवश्यक साहित्य. ८) सार्वजनिक स्थळी करीता सर्व प्रकारचे लागणारे साहित्य-थ्रीरीसीटर लोखंडी बेंच व इतर सर्व प्रकारचे साहित्य. ९) अंगणवाडी करीता लागणारे सर्व प्रकारचे साहित्य-खेडणी साहित्य व सर्व प्रकारचे साहित्य. १०) उपकेंद्र करीता लागणारे साहित्य-बेड कार्यालयीन सर्वप्रकारचे आवश्यक साहित्य. ११) पाणी शुद्धी करण करण्याकरिता ब्लिचींग पावडर व इतर.

**अटी व शर्ती**

१) दर पत्रक मंजुर झाल्यास १०० स्टेंम्प पेपर पर करारनामा करुन धावे लागेल.

२) कोणतेही कारण न दर्शविता दरपत्रक मंजूर किंवा नामंजूर करण्यास अधिकार सरपंच/ग्रामसेवक बलमाटोला राखून ठेवण्यात आले आहे.

**सरपंच** ग्राम पंचायत, बलमाटोला — **ग्रामसेवक** ग्राम पंचायत, बलमाटोला

# नवेझरी ग्राममंडळावर प्रशासकाची नियुक्ती करण्यात यावी-ग्रामस्थांची मागणी

**तिरोडा:-** तालुक्यातील नवेझरी ग्राम मंडळाचा कार्यकाळ सहा जूनला संपला असून पुढील निवडणुका घेण्याआधी विनियम करणे गरजेचे आहे, तोपर्यं त ग्राम मंडळावर प्रशासकाची नियुक्ती करण्यात यावी अशी मागणी ग्रामस्थांनी जिल्हाधिकाऱ्यांना केली आहे.

गोंदिया जिल्ह्यात एकूण तीन ग्रामदान मंडळ आहेत. तिरोडा तालुक्यात नवेझरी व कुलपा तर सालेकसा तालुक्यात कुलरभट्टी. नवेझरी ग्राम मंडळाचा कार्यकाळ सहा जूनला संपला. त्याआधी ग्रामसभा घेऊन विनियम करणे आवश्यक असते. मात्र मागील कार्यकारणी तसे करण्यास असमर्थ ठरली.

महाराष्ट्र ग्रामदान अधिनियम १९६४ सन १९६५ चा अधिनियम २३ च्या अंतर्गत काही ग्रामदान होवून महाराष्ट्रातील नऊ जिल्ह्यातील १५ तालुक्यात २१ ग्राममंडळ कार्यरत आहेत. या अधिनियमाच्या कलम ४४ (१) ने ग्रामदानी गावच्या ग्राम मंडळास, शासनाच्या पूर्व संमतीने अधिनियम ाच्या उद्देश व उपबंधाच्या अंमलबजावणीसाठी आपले मविनियमफ करण्याचे अधिकार दिले आहेत. लोकांची साक्षरता व कायदेविषयक समज लक्षात घेवून, त्यावेळी शासनाने अशा विनियमाचा एक नमूना सन १९७४ मध्ये 'आदर्श विनियम' या नावाने ग्रामदानी गावांना पुरविला व हे विनियम ग्राम सभेत पारीत करून शासनाच्या पुर्व संमतीसाठी पाठविण्याचे सुचित केले. मात्र हे काम त्यावेळी ग्राम मंडळाकडून झाले नसावे. परंतु या आदर्श विनियमास शासन मंजुरी असल्याचे गृहीत धरून गेली ४५-५० वर्षे गावी कारभार सुरू आहे या विनियमाच्या प्रकरण २ नियम-३ मध्ये सांगितलेल्या पद्धती नुसार ग्राम सभेत अध्यक्ष व उपाध्यक्षाची ४ वर्षाच्या मुदतीची निवडणूक देखिल अधिकृतपणे प्रशासना कडून घेतली जाते. नवेझरी येथील अध्यक्ष व उपाध्यक्षाची निवडणूक घेण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली होती. मात्र विनिमयास शासन मंजुरी येईपर्यंत ग्राम मंडळाच्या निवडणुका घेणे विधी संमत होणार नसल्याने आता तिथे प्रशासक बसवून विनियम मंजूर करण्याची प्रक्रिया करणे आवश्यक आहे.

नवेझरी गावाला महाराष्ट्र ग्रामदान मंडळाने ३० डिसेंबर २०२१ पासून विनिमय बनवण्या करीता पत्र पाठविले होते. त्या नंतर ग्रामदान मंडळाने २४ व २५ मार्च २०२२ या कालावधी मध्ये राज्य स्तरीय शिबिराचे सेवाग्राम येथे आयोजन केले होते.

पुन्हा ५ फेब्रुवारी २०२३ ला ग्रामदान मंडळाचे सचिव यांनी नवेझरी ग्राम मंडळास भेट दिली. या नंतर २२ एप्रिल २०२३ ला पुन्हा विनिमय करण्या करीता पत्र पाठविले. मात्र ग्राममंडळ कार्यालय नवेझरी यांनी सदर विनियमचा विचार न करता सभा बोलावली नाही.




त्यानंतर दि. ३१मे २०२३ व दि. ०५ जुन२०२३ ला विनियम बनविण्याकरीता बोलावलेली ग्रामसभा तहकूब झाली. लगेचच ६ तारखेला ग्रामसभा घेण्यात आली. त्यामध्ये ग्रामस्थांचे विचार लक्षात न घेता सभा बंद झाल्याचे सांगून अध्यक्ष महेंद्र भांडारकर सभा सोडून निघून गेले. यावरुन ते निमयाची ग्रामसभा घेण्यास असमर्थ आहेत असे दिसून आले. या अनुसंगाने मंडळावर प्रशासकाची नियुक्ती करण्यात यावी तसेच विनियम झाल्यानंतर अध्यक्ष व उपाध्यक्षाची निवडणूक गुप्त मतदान पद्धतीने घेण्यात यावी अशी मागणी जिल्हाधिकाऱ्यांना केली आहे. नवेझरीचे ग्रामस्थ आता प्रशासक व विनियमाच्या प्रतीक्षेत आहेत.

# नक्षलग्रस्त गावात पोलिसांचा बचतगट

**अर्जुनी मोरगाव:** जिल्ह्याच्या शेवटच्या टोकावर असलेल्या गडचिरोली जिल्ह्याच्या सीमेवरील केशोरी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील तिरखुडी या अतिदुर्गम व नक्षलदृष्ट्या अतिसंवेदनशील गावातील नागरिकांशी केशोरी पोलिसांनी विविध उपक्रमाच्या माध्यमातून सुसंवाद साधत गावातील महिला व पुरुषांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणता यावा, त्यांना रोजगार उपलब्ध व्हावा, यासाठी महिला बचत गटाची स्थापना करुन नवीन अध्याय जोडला आहे.



गोंदिया जिल्हा हा नक्षलग्रस्त जिल्हा म्हणून ओळखल जा-तो. जिल्ह्याला लागूनच गडचिरोली जिल्ह्याचे जंगल परिसर आहे. तर याच भागात अर्जुनी मोरगाव तालुक्यातील केशोरी पोलीस ठाणे असून या पोलीस ठाण्याच्या अंतर्गत तिरखुडी हे नक्षलदृष्ट्या अतिसंवेदनशील गाव आहे. अतिदुर्गम जंगल परिसरातील या गावामध्ये शासनाच्या कोणत्याही योजना पोहोचलेल्या नाहीत. नागरिकांना शासनाच्या विविध योजनाबाबत माहिती देऊन त्या ठिकाणी शासनाच्या योजना पोहचाव्यात, तेथील महिला व युवकांना रोजगार मिळावा हा मानस मनाशी बाळगून केशोरीचे ठाणेदार सोमनाथ कदम व अंमलदार यांनी वेळोवेळी तिरखुडी येथे भेट देऊन गावातील महिलांशी व लोकांशी हितगुज साधून विविध योजनांबाबत माहिती देत असतात.

दरम्यान, पोलीस दाद-ालोरा खिडकी योजनेंतर्गत १० जूनला केशोरी पोलीस स्टेशनने तिरखुडी गावातील महिलांना एकत्रीत करुन बचत गटाचे त्यांना महत्व समजावून सांगत एकूण १४ महिलांचा जय गोंडवाना महिला बचत गट तिरखुडीची निर्मिती केली.

ही कामगिरी पोलीस अधीक्षक निखील पिंगळे, अपर पो-लीस अधीक्षक अशोक बनकर, उपविभागीय पोलीस अधिकारी देवरी संकेत देवळेकर यांच्या मार्गदर्शनात केशोरीचे ठाणेदार सोमनाथ कदम, महिला पोलीस हवालदार पुनम हरिणखेडे, महिला पोलीस शिपाही निशा बोंदरे यांनी केली आहे.

# एनटीआर मधील वन्यजीव व वनसंपदा धोक्यात

**गोंदिया:** गेल्या काही दिवसापुर्वी दोन वाघिणींना नवे-गाव-नागझिरा व्याघ्र (एनटीआर) प्रकल्पात सोडण्यात आले. त्यामुळे राज्यातील पर्यटकांच्या नजरा याकडे वळल्यात. आजघडीला व्याघ्र दर्शनासाठी नवेगाव-नागझीरा महत्वाचा केंद्र ठरत आहे. असे असताना जिल्ह्यातील जंगलात वाढत्या चोरीच्या घटनांमुळे एनटीआर सह जिल्ह्यातील जंगलातील वन्यजीवांसह वनसंपदा धोक्यात तर आली नाही. असा प्रश्न निर्माण होत आहे. याची प्रचिती एनटीआर च्या कोअर झोनमध्ये येणाऱ्या जिल्ह्यातील सहवन-क्षेत्र डोंगरगाव वन्यजीव स्थित कोहमारा अधिनस्त येत अलसेल्या ढोलीटोला नाला जंगल परिसरातून चोरी गेलेल्या टायगर मॉनिटरिंग टॅप कॅमेराच्या घटनेतून येत असून कॅमेऱ्यात नेमके काय ट्रॅप झाले होते? कॅमेरा चोरीच्या मागे काय उद्देश आहे? असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत,

गोंदिया जिल्ह्याला निसर्गाने भरभरुन नैसर्गिक सौंदर्य दिलेले आहे. जिल्ह्याच्या बहुतांश भाग जंगलाने व्यापलेला असून (एनटीआर) नागझिरा नवेगावबांध टाइगर रिझर्व प्रोजेक्टमुळे वन्यप्राणी आणि वनसंपदा जिल्ह्याचा आकर्षणाचा केंद्र ठरत आहे.

विशेष म्हणजे नुकतेच राज्याचे वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या उपस्थितीत दोन वाघिणी जिल्ह्यातील जंगलात सोडण्यात आल्या. त्यापैकी टी-१ वाघीण जिल्ह्यात भटकत असल्याचे वृत्त आहे हे वृत्त ताजे असतानाच वनविभागाचे डोंगरगाव सहवन क्षेत्रात टायगर मॉनिटरिंगसाठी लावलेला सी-१ कडी बँक प्रोफेशनल कलर टॅप कॅमेरा चोरीला गेल्याची घटना घडली. या प्रकरणी देवरी पोलिसांमध्ये चोरीचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे. तर चोरीला गे-लेला कॅमेरा दहा ते बारा हजार रुपयापर्यंतचा असला तरी टायगर मॉनिटरिंगसाठी लावलेल्या त्या कॅमेरामध्ये नेमके काय ट्रॅप झाले होते? असा प्रश्न वन्यप्रेमींना पडला आहे.

**वनविभाग संशयाच्या भवऱ्यात**

**सुत्राच्या माहितीनुसार देवरी तालुक्यात लक्झरी गाड्यामधून लाकूड तस्करी होत असल्याच्या चर्चांना उधाण आले आहे. हे होत अताना जंगल परिसरात लावलेला वनविभागाचा कॅमेरा चोरीला गेल्याने वनविभागाही संशयाच्या चौखटीत असल्याचे दिसून येत आहे.**

**देवरी पोलिसात नोंद**

**सहवनक्षेत्र खडकी वनपरिक्षेत्र कार्यालय डोंगरगाव वन्यजीव स्थित कोहमा रा अधिनस्त वनपरिक्षेत्रातील ढोलीगोटा नला जंगल परिसात लावण्यात आ-लेला सी १ कडी बँक प्रोफेशनल कलर टॅप कॅमेरा चोरी गेल्याची घटना ७ जून रोजी उघडकीस आली. दरम्यान ही घटना देवरी पोलिसांच्या हद्दीत येत असल्याने फिर्यादी दीपक चोपराम बरडे (वय ३६ रा.खडकी. ता.सडक अर्जुनी बिट रक्षक खडकी भाग-२) यांच्या तक्रारीवरुन देवरी पोलिसांत गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

कॅमरा चोरीला गेल्यामुळे त्या परिसरात शिकार झाली का? जिल्ह्यात सक्रिय असलेल्या गॅगने लाकूड चोरी केली का? पुरावे मिटविण्यासाठी कॅमरा चोरी गेला का? असे अनेक प्रश्न निरुत्तरीत आहे.

विशेष म्हणजे गेल्या काही महिन्यापुर्वी काळ्या बिबट्याच्या शिकार प्रकरणी सक्रिय गॅग अटक झाल्यानंतर दुसरी गॅग तर अस्तित्वात नाही? हा महत्व-ाचा मुद्दा वन्यजीव प्रेमीकडून उपस्थित केला जात आहे. तर टायगर मॉनिटरिंगसाठी लावलेला प्रोफेशनल कलर टॅप कॅमेरा चोरीमुळे वन्यप्राण्यांचे अस्तित्व धोक्यात येण्याची भिती वन्यजीव प्रेमीकडून व्यक्त केली जात आहे.

# रुग्णांना अजूनही आणावे लागते बैलबंडीने

**अर्जुनी मोरगाव:** तालुक्यातील केशोरी परिसर शेवटच्या टोकावर आहे. या परिसरातील आदिवासी दुर्गम भागात समाविष्ट असलेली उमरपायली, दकोटोला, चिसटोला, खडकी, तिरखुडी, बलीटोला या गावांना जाण्यासाठी चांगले रस्ते असले तरी दळणवळणाच्या साधनाअभावी गावामधून आजारी रुग्णांना बैलबंडीच्या सहाय्याने जवळ असलेल्या केशोरी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी आणावे लागते.

ही गैरसोय टाळण्यासाठी आदिवासी गावांमध्ये स्वतंत्र आरोग्य सेवा उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. या गावांमध्ये रस्ते विकास झाला आहे परंतु अजूनही या गावांमध्ये परिवहन मंडळाची एसटी पोहोचली नाही. ही वास्तविकता आहे. महाराष्ट्र शासनाची शहर असो की खेडेगाव असा त्या गावातील प्रत्येक घटकापर्यंत आरोग्य सुविधा पुरविणे ही जवाबदारी आहे.

त्यादृष्टीने प्रत्येक खेडेगावात आरोग्य सुविधा पुरविण्यासाठी स्वतंत्र आरोग्य कर्मचाऱ्यांची पद निर्माण करुन कार्यान्वित करणे गरजेचे आहे. मात्र याची अद्यापही शासन आणि लोकप्रतिनिधी दखल घेतली नाही. त्यामुळे अनेक समस्या कायम आहे. केशोरी परिसरातील उमरपायली, दकोटोला, डोंगरगाव, वारव्ही, आंभोरा, बिसटोला, खडकी, तिरखुडी, बलीटोला या गावात स्वतंत्र आरोग्य कर्मचाऱ्यांची नियुक्ती करुन कार्यान्वित करावे. या गावांमध्ये आजाराचे प्रमाण सर्वाधिक असते. त्यामुळे नेहमी आरोग्य व्यवस्थेवर प्रश्न निर्माण होत असतो. या परिसरात फक्त केशोरी प्राथमिक आरोग्य केंद्र आहे. दुसरे प्राथमिक आरोग्य केंद्र इळदा येथे मंजूर होून सुसज्ज इमारत निर्माण करण्यात आली आहे. पंतु ते प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यान्वित करण्यात आले नाही. हे त्या भागातील नागरिकांचे दुदैव म्हणावे लागेल. दुदैवाचा फेरा केव्हा संपेल याची निश्चितता नाही.

**एसटीचे दर्शन दुर्लभ**

**शासनाने लोकसंख्या निकष लक्षात घेऊन प्राथमिक आरोग्य केंद्र, उपप्राथमिक आरोग्य केंद्र निर्माण करुन आरोग्यसेवा उपलब्ध करुन दिली आहे. परंतु उमरपायली, दकोटोला, डोंगरगाव, वारव्ही, आंभोरा, बिसटोला, खडकी, तिरखुडी, बलीटोला या गावांना दळणवळ-णाची साधने उपलब्ध होत नाही. त्यामुळे गंभीर आजारी रुग्णांना अजूनही बैलबंडीच्या सहाय्याने प्राथमिक आरोग्य केंद्र केशोरी येथे आणावे लागत असल्याने आरोग्याची समस्या कायम आहे.**



# राजकारासोबतच समाजकारण हाच राष्ट्रवादी काँग्रेसचा उद्देश-राजेंद्र जैन

**गोंदिया:** राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण या धोरणावर काम करतो. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार व खासदार प्रफुल्ल पटेल यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून काम करणाा पक्ष आहे.कितीही कठीण प्रसंग अले तरी जनता, पदाधिकारी व कार्यकर्ता पवार साहेबांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले. त्यामुळेच आज पक्षाचा वर्धापन दिन मोठ्या थाटात साजरा करीत आहोत असे प्रतिपादन माजी आमदार राजेंद्र जैन यांनी केले.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या २४ व्या वर्धापन दिनानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस भवन येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यापप्रसंगी ध्वजारोहण माजी आमदार जैन, जिल्हाध्यक्ष गंगाधर परशुरामकर, विनोद हरिणखेडे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. याप्रसंगी परशुरामकर यांनी जिल्ह्यातील जनतेला खासदार पटेल यांच्या नेतृत्वावर विश्वास आहे हा पक्ष शेतकरी-शेतमजुरांचा असून पटेल यांनी नेहमी शेतकऱ्यांच्या हिताचे काम केले आहे. पक्षाचा वर्धापन दिन साजरा करताना सर्वांनी पक्ष वाढीसाठी बुथर-तरावर संघटन मजबूत करणार असे प्रण घ्यावे असे सांगितले. तसेच पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्षपदी खासदार सुप्रिया सुळे व खासदार प्रफुल्ल पटेल यांची निवड झाल्याबद्दल पक्षाच्यावतीने त्यांचे कौतूक करण्यात आले.




याप्रसंगी राजलक्ष्मी तुरकर, प्रभाकर दोनोडे, केतन तुरकर, विशाल शेंडे, रफीक खान, पूजा सेठ, अशोक सहारे, मनोहर वालदे, डॉ. माधुरी नासरे, सुशीला भालेराव, ॲड. वैशाली जाधव, विनीत सहारे, अश्विनी पटले, नीरज उपवंशी, सरला चिंखलोंडे, शंकरलाल टेंभरे, आशा पाटील, कुंदा दोनोडे, पुष्पलता माने, लता रहांगडाले, मानवती बैस, भाविक नागपुरे, चेतना पराते, केवल बघेले, घनश्याम मस्करे, राजू एन.जैन, अखिलेश सेठ, मोहन पटले, पीयुष झा, रवी मुंदडा, भगत ठकरानी, नितीन टेंभरे, चंद्रकुमार चुटे, इकबाल सय्यद, लिकेश चिखलोंडे यांच्यासह कार्यकर्ता व पदाधिकारी उपस्थित होते.

# मनरेगा अंतर्गत १ लाख ७८ हजार कुटूंबांना रोजगार

**गोंदिया :-** महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत जिल्ह्यात सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात १ एप्रिल २०२२ ते मार्च २०२३ पर्यत रुपये २६६५९.६८ लक्ष निधी खर्च झालेले असून त्यामधून ६२.४५ लक्ष मनुष्य दिवस निर्मिती झालेली आहे. या आर्थिक वर्षात १,७८,६६५ कुटूंबांना रोजगार पुरविण्यात आ-लेला आहे.

सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात जिल्हाधिकारी गोंदिया यांच्या मार्गदर्शनाखाली वैयक्तिक लाभामध्ये सिंचन विहिर, गुरांचा गोठा, शौचालय बांधकाम, घरकुल बांधकाम, शेळ्यांचा गोठा, कुक्कुटपालन शेड, नॉपेड खत, गांडूळ खत निर्मितीसाठी टाकी तसेच पाणी टंचाईची समस्या सोडविण्यासाठी शोष खड्डे इत्यादी कामांचे नियोजन करुन आर्थिक वर्षात लेबर बजेटच्या लक्षांक ६३.५२ लक्ष मनुष्य दिवस नुसार ६२.४५ लक्ष मनुष्य दिवस उद्दिष्ट साध्य केले आहे.

एकंदरीत जिल्ह्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत ग्रामपंचायतीमध्ये मोठ्या प्रमाणात विकासाची कामे उदा. मातीबांध, पांदन रस्ते, सिंचन विहिरी, रस्ता दुतर्फा वृक्ष ला-गवड, भातखाचर, शौचालय, नाला सरळीकरण, तलावातील गाळ काढणे/तलावाचे खोलीकरण, शेत-तळे, वनतळी, मैदान सपाटीकरण करणे इत्यादी कामे होत आहेत. सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात गोंदिया जिल्ह्यात ३,३८६ कामे पुर्ण करण्यात आले आहे.



सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात देखील जास्तीत जास्त मजुरांना रोजगार उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने कामाचा नियोजन आराखडा तयार करण्यात आलेला आहे. त्यानुसार प्रत्येक ग्रामपंचायतमध्ये कामे सुरु करुन जास्तीत जास्त कुटूंबांना १०० दिवस रोजगार उप-लब्ध करुन देण्यात येईल. सध्या जिल्ह्यात सेल्फवर ९,७४६ कामे असून यावर्षी सुध्दा लेबर बजेटचे उद्दिष्टप्रमाणे मार्च-२०२४ अखेर पर्यंत १०० टक्के उद्दिष्ट साध्य होईल. असे उपजिल्हाधिकारी (रोहयो) लिना फलके यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे.

# न.प.अधिकारी,कर्मचाऱ्यांना हेल्मेट सक्ती

**गोंदिया:** येथील नगर परिषदेच्या मुख्याधिकारी करच चव्हाण यांनी परिपत्रक काढून अधिकारी, कर्मचाऱ्यांना हेल्मेटची सक्ती केली आहे. सोबतच नगरपरिषदेत कामानिमित्त दुचाकीचे येणाऱ्या नागरिकांनाही हेल्मेट बंधनकारक करण्यात आले आहे. त्यामुळे पुन्हा शहरातच नव्हे तर जिल्ह्यात हेल्मेटसक्ती होण्याची चिन्हे दिसून येत आहेत.

दुचाकी वाहनांचा वेग आता चालकाच्या नियंत्रणाबाहेर गेला आहे. इतके विदारक चित्र दररोज मुख्य रस्त्यावरच नव्हे तर शहरातील वर्दळीच्या रस्त्यावर दिसून येत आहे. रेसिंग बाईक तरुण मुले अगदी वेगाने पळवतात. त्यामुळे रस्ता अपघाताचे प्रमाणही वाढले आहे. काहींना कायमचे अपंगत्वही आले आहे. त्यामुळे डोक्याला गंभीर इजा होऊन गतप्राण होणाऱ्यांची संख्याही अधिक आहे. हा आजवरचा अनुभव आहे. परिणामी, डोक्यात हेल्मेट असणे गरजेचेच झाले आहे. काही वर्षापुर्वी शहरासह जिल्ह्यात हेल्मेटसक्ती झाली होती. मात्र काही महिन्यानंतर हेल्मेटला चालकांनी दूर सारले. सैरावैरा वाहने पळू लागली. केवळ पोलिसांपासून वाचविण्यासाठी किंबहूना दंडात्मक कारवाईपासून वाचण्यासाठी हेल्मेट तेवढ्यापुरता वापरला जात होता. मध्यंतरी हेल्मेटसक्ती दूरच झाली. रस्ता अपघातही घडू लागले. डोक्यावर इजा होऊन गतप्राण होणाऱ्यांचे प्रमाण वाढू लागले. त्यामुळे हेल्मेट वापरणे गरजेचे झाले आहे. दरम्यान, नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांनी नगर परिषदेतील अधिकारी, कर्मचाऱ्यांसह दुचाकीने नगरपरिषदेत कामानिमित्त येणाऱ्या नागरिकांना हेल्मेटसक्ती केली आहे. तसे परिपत्रक काढले आहे. मुख्याधिकाऱ्यांच्या या परिपत्रकानुसार सध्या तरी हेल्मेट वापरुन येणारे अधिकारी, कर्मचारी दिसत असले तरी ही सक्ती अल्प काळाची ठरु नये अशी चर्चा शहरात सुरु आहे.

# भंडारा-गोंदिया लोकसभा निवडणूक प्रमुखपदी विजय शिवणकर, विधानसभा प्रमूखही जाहीर

**गोंदिया:-** भारतीय जनता पक्षाच्यावतीने महाराष्ट्रातील ४८ लोकसभा मतदारसंघात येत्या २०२४ च्या निवडणुकीची तयारीच्या दृष्टीने लोकसभा निवडणूक प्रमुखांची घोषणा आज प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यानी केली आहे.यामध्ये गोंदिया-भंडारा लोकसभा मतदारसंघाच्या निवडणूक प्रमुखपदावर माजी जिल्हा परिषद अध्यक्ष विजय शिवणकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तर नागपूर लोकसभा निवडणूक प्रमूखपदावर प्रविण दटके व गडचिरोली-चिमूर लोकसभा निवडणूक प्रमुख पदावर किसन नागदेवे यांची निवड.करण्यात आली आहे.



उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सागर निवासस्थानी शनिवारी एक बैठक पार पडली. या बैठकीत खासदार आणि आमदारांचा देखील समावेश होता. शिवसेना आणि भाजपचे उमेदवार निवडून यावे म्हणून या निवडणूक प्रमुखांकडे त्या त्या मतदारसंघानुसार जबाबदारी देण्याचा निर्णय या बैठकीत झाल्याची माहिती आहे. लोकसभेप्रमाणेच विधानसभेच्या २८८ मतदारसंघांतही अशेच निवडणूक प्रमुख नियुक्त करण्यात येणार आहेत. त्याचप्रमाणे गोंदिया जिल्ह्यातील गोंदिया विधानसभा निवडणूक प्रमुख पदी माजी आमदार हेमंत पटले, तिरोडा-गोरेगाव विधानसभा निवडणूक प्रमूख पदी भाजपचे माजी तालुकाध्यक्ष डॉ.वसंत भगत, अर्जुनी मोरगाव विधानसभा निवडणूक प्रमुख पदावर माजी मंत्री इंजि.राजकुमार बडोले, आमगाव विधानसभा माजी आमदार संजय पुराम, साकोली विधानसभा प्रमुख-माजी मंत्री परीणय फुके, तुमसर विधानसभा निवडणूक प्रमूखपदी प्रदिप पडोळे यांची निवड करण्यात आली आहे.

# भंडारा-गोंदिया मतदारसंघावर राहणार राष्ट्रवादीचाच हक्क

**गोंदिया:** वर्षभरानंतर होणाऱ्या लोकसभा निवडणुकीसाठी आता सर्वच पक्षांनी मोर्चेबांधणी करण्यात सुरुवात केली. त्यातच आता महाविकास आघाडी झाल्यास कोणता मतदारसंघ कोणासाठी अनुकूल व प्रतिकूल यासाठी आढावा घेतला जात आहे. चार दिवसांपुर्वी काँग्रेसने भंडारा गोंदिया लोकसभा मतदारसंघाचा दावा केला होता. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांनी राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत भंडारा-गोंदिया मतदारसंघावर राष्ट्रवादी काँग्रेसच लढेल तुम्ही फक्त उमेदवार ठरवा निवडून आम्ही आणू असा विश्वास व्यक्त केला. त्यामुळे मतदारसंघावरुन निवडणुकीपुर्वीच आघाडीत बिघाडी निर्माण होण्याची शक्यता बळावली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यावतीने मुंबई प्रदेश कार्यालयात भंडारा-गोंदिया लोकसभा मतदारसंघाचा पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी आढावा घेतला. लोकसभेच्या निवडणूका जवळ आल्याने गोदिया-भंडारा लोकसभा मतदारसंघातील पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना मुंबई येथील पक्ष कार्यालयात बोलविण्यात आले होते. याप्रसंगी खुद्द खा. शरद पवार यांनी स्वत: आढावा घेऊन दोन्ही जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांचे म्हणणे एकूण घेतले. यावेळी खा. प्रफुल्ल पटेल, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, विरोधी पक्षनेते अजित पवार, छगन भुजबळ याशिवाय पक्षाचे ज्येष्ठ नेते उपस्थित होते.




दोन्ही जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांनी हा मतदारसंघ राष्ट्रवादी काँग्रेसच्या कोट्यातील असल्याने पक्षाचे ही जागा लढवावी तसेच खा. प्रफुल्ल पटेल यांनी उमेदवारी ठरवावी. त्याला निवडून आणण्याची जवाबदारी आमची असेल, असे शरद पवार आणि नेत्यांना सांगितले.

सभेला आ.राजू कारेमोरे, मनोहर चंद्रीकापुरे, भंडारा जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष नाना पंचबुद्धे, गोंदिया अध्यक्ष गंगाधर परशुरामकर, प्रदेश सचिव धनंजय दलाल, भंडारा जिल्हा सहकारी बँकेचे अध्यक्ष सुनील फुंडे, म्हाडाचे माजी सभापती नरेश माहेश्वरी, महिला अध्यक्षा राजलक्ष्मी तुरकर, अविनाश ब्राम्हणकर व महिला राष्ट्रवादी काँग्रेस व पक्षाचे इतर पदाधिकारी उपस्थित होते.

**महाविकास आघाडीत पडणार का मिठाचा खडा**

**भंडारा-गोंदिया लोकसभा मतदारसंघावर काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही जिल्ह्यातील नेत्यांनी दावा केला आहे. तर दोन्ही पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना कामाला लागण्याचे आदेश दिले आहे. तर काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले हे सुद्धा काँग्रेस्या पदाधिकाऱ्यांच्या म्हणण्याशी सहमत असल्याचे बोलले जाते. त्यामुळे लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडी होण्यापुर्वीच त्यात यावरुन मिठाचा खडा पडणार का अशी चर्चा आहे.**

**पदाधिकाऱ्यांना दिले कामाला लागण्याचे आदेश**

**भंडारा-गोंदिया लोकसभा मतदारसंघ मागील २४ वर्षापासून राष्ट्रवादी काँग्रेसच्या कोट्यात आहे. त्यामुळे महाविकास आघाडी झाली तरी हा मतदारसंघ राष्ट्रवादी काँग्रेसच्याच कोट्यात असेल या मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेसचाच उमेदवार लढेल असा विश्वास शरद पवार व प्रफुल्ल पटेल यांनी दोन्ही जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांना देत कामाला लागण्याचे आदेश दिल्याची माहिती आहे.**

**उमेदवार प्रफुल्ल पटेल की आणखी कोण?**

**कर्नाटकमधील निवडणुकीनंतर महाविकास आघाडीतील तिन्ही पक्षांच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत. लोकसभा निवडणुकीत याचा फायदा होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. त्यातच राष्ट्रवादी काँग्रेसच्या कोट्यात असलेल्या भंडारा-गोंदिया लोकसभा मतदारसंघातून खा. प्रफुल्ल पटेल रिंगणात उतरण्याची शक्यता आहे. त्यांनी तक्रार दिल्यास नाना पंचबुद्धे, राजेंद्र जैन, सुनील फुंडे, राजू कारेमोरे, खुशाल बोपचे यांचेसुद्धा नावे चर्चेत आहेत.**


**दृष्टी बहुउद्देशिय विकास संस्था (NGO) गोंदिया**

महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटी मुंबई द्वारा संचालित

**DRUSHTI TI-FSW PROJECT, GONDIA**

जाहिरात (Wanted)

महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटी मुंबई (TI-FSW) व दृष्टी बहुउद्देशिय विकास संस्था (NGO) गोंदिया द्वारा संचालित दृष्टी (TI-FSW) प्रकल्प गोंदिया अंतर्गत दृष्टी TI-FSW प्रकल्प करीता येथील खालील पद कंत्राटी स्वरुपात त्वरीत भरावयाची आहेत. तरी इच्छुक उमेदवारांनी दिलेल्या दिनांक व स्थळी आपल्या मुळ प्रमाणपत्रासह उपस्थित रहावे.

| अ.क्र. | पदाचे नांव | आवश्यक अहर्ता | अनुभव | संख्या |
|---|---|---|---|---|
| १. | बाहय संपर्क कर्मचारी (ORW) | १२ वी पास | एचआयव्ही एड्स कार्यक्रम मध्ये काम करण्याचे अनुभव असणे आवश्यक | १ |

मुलाखत दिनांक :- १५/०६/२०२३ वेळ - दुपा. २.०० ते ५.०० वाजेपर्यंत

मुलाखतीचे स्थळ : Drushti TI-FSW Project, Gondia Kaka Chowk, Civil Line, Gondia

१) मुलाखतीचे येण्याचा कोणताही खर्च देण्यात येणार नाही.
२) मुलाखतीस मुळ कागद पत्रासह व दोन पासपोर्ट फोटोसह उपस्थित रहावे.
३) उमेदवाराकडे स्वतःचे दुचाकी वाहण असणे आवश्यक आहे.

अध्यक्ष/सचिव

दृष्टी बहुउद्देशिय विकास संस्था (NGO) गोंदिया

संपर्क :- ८५५१९७७७५५